# कृष्णार्पणमस्तु

KRISHANARPANMASTU Title-Code: MAHMAR52590

Volume : 2 | Issue : 2 | Marathi Monthly | Thane, 1 August 2024 to 31 August - 2024 | Pages 16 | Price : 10/-


# मुलुंडमध्ये नवीन ‘धारावी’ची उभारणी, हे राज्य सरकारचे पाप !

## ‘धर्मराज्य पक्षा’चे अध्यक्ष राजन राजे यांचा सत्ताधाऱ्यांवर जोरदार घणाघात...

**ठाणे (प्रतिनिधी) :** आशिया खंडातील सर्वात मोठी झोपडपट्टी असलेल्या धारावीचा पुनर्विकास करण्याचे काम, अदानी समूह आणि राज्य सरकारच्या माध्यमातून हाती घेण्यात आले आहे. धारावीकरांचे पुनर्वसन मुलुंडमध्ये करण्यास, मुलुंडकरांनी वर्षभरापूर्वीपासूनच विरोध सुरु केलेला असतानाही, पुनर्वसनाच्या हालचाली राज्य सरकारने सुरुच ठेवल्या असून, याच पार्श्वभूमीवर रविवार, दि. २८ जुलै-२०२४ रोजी, मुलुंडकरांनी रस्त्यावर उतरुन आंदोलन केले. ‘पीएपी हटाव’, मुलुंड बचाव या घोषणांनी मुलुंड पूर्व परिसर दणाणून सोडला होता. **मुलुंडकरांना विश्वासात न घेता, धारावीसह मुंबईतील विविध प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन (पीएपी) मुलुंडमध्ये करु नये, अशा प्रकल्पांमुळे मुलुंडकरांच्या पायाभूत सुविधांवर प्रचंड ताण निर्माण होऊन, त्यातून संघर्ष निर्माण होईल, त्यामुळे कोणत्याही प्रकल्पग्रस्तांसाठी मुलुंडमध्ये प्रकल्प राबवू नये, प्रकल्पग्रस्तांसाठी राबविण्यात येणारे सर्व प्रकल्प रद्द करा, या मागणीसाठी शेकडो मुलुंडकरांनी रस्त्यावर उतरुन राज्य सरकारचा निषेध केला. ‘आपण सारे मुलुंडकर’ या संस्थेच्या वतीने, मुलुंड पूर्व येथील मराठा मंडळ भवनाजवळ निषेध मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ‘धर्मराज्य पक्षा’चे अध्यक्ष व ज्येष्ठ कामगार नेते राजन राजे आणि बँकिंग तज्ज्ञ तसेच, ज्येष्ठ विचारवंत विश्वास उटगी यांनी उपस्थित राहून, आंदोलनकर्त्यांना मार्गदर्शन केले.**

दरम्यान, उपस्थित आंदोलनकर्त्या मुलुंडकरांशी संवाद साधताना ‘धर्मराज्य पक्षा’चे अध्यक्ष राजन राजे म्हणाले की, याक्षणाला मी इथे उभा आहे, तो फक्त आणि फक्त आपला प्रतिनिधी म्हणूनच... आजघडीला संपूर्ण महाराष्ट्र आणि भारत देश अनेक समस्यांनी ग्रस्त आहे. यापाठीमागे या संपूर्ण समाजाची विशिष्ठ मानसिकता आहे. येत्या १५ ऑगस्टला आपला स्वातंत्र्यदिन आहे. मित्रांनो, आपण फक्त स्वतंत्र झालेलो नाही; तर, आपला देश ‘प्रजासत्ताक-राष्ट्र’ आहे. प्रजासत्ताक या शब्दाचा अर्थ फार मोठा असला तरीही, दुर्दैवाने आपल्या देशात मतदानापुरतीच लोकशाही आहे. लोकेच्छा ही प्रतिबिंबित व्हायलाच पाहिजे आणि यालाच ‘प्रजासत्ताक-राष्ट्र’ असे म्हणतात. मात्र, इथे दडपशाही आणि दंडेलशाही चाललीय, हे धारावी पुनर्विकासाच्या निमित्ताने स्पष्ट झालेलेच आहे. **मुलुंडमध्ये नवीन ‘धारावी’ची उभारणी, हे राज्य सरकारचे पाप असून, कालपर्यंत मुलुंडमध्ये कचऱ्याचं डम्पिंग करत होते, आता माणसाचं करतायत. मतदारराजा म्हणून, या लोकशाहीचा पाईक या नात्याने, तुम्हाला कायम जागं राहणं गरजेचं आहे, हे लक्षात ठेवा. मी काही धर्मविरोधी नाही; पण, तुम्ही घरात पूजा-प्रार्थना करीत बसलात तर, न्याय्य मिळणार नाही. धार्मिकता पूजाअर्चा करुन सिद्ध होत नाही; तर, सत्य आणि न्याय्य मिळवण्यासाठी लढावं लागतं, तोच खरा धर्म! अशा परखड शब्दांत राजन राजे यांनी, उपस्थितांना संबोधित केले.**

**यावेळी पुढे बोलताना ‘धर्मराज्य पक्षा’चे अध्यक्ष** ...पृष्ठ क्र. २ वर

## नागरिकांच्या वित्तहानी आणि जीवितहानीस कारणीभूत ठरणारा, घोडबंदर सेवारस्त्याच्या विलीनीकरणाचा ‘वादग्रस्त प्रकल्प’ रद्द करण्याची ‘धर्मराज्य पक्षा’ची मागणी



**ठाणे (प्रतिनिधी):** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीतील, घोडबंदर मार्गावर असणाऱ्या, कापूरबावडी ते गायमुखपर्यंतच्या महामार्गावरील सेवारस्ता (सर्व्हिस रोड) मुख्य रस्त्यात विलीनीकरण करण्याचा निर्णय घेतला असून, याकामी एमएमआरडीएने तब्बल ४०० कोटींची निविदा काढली आहे. विलीनीकरणाच्या माध्यमातून सेवारस्ता (सर्व्हिस रोड) आणि मुख्य रस्त्यामधील पदपथ कायमस्वरुपी काढले जाणार आहेत. सेवारस्ता आणि मुख्य रस्त्याच्या मध्ये ...पृष्ठ क्र. २ वर

## ठाणे शहरातील खड्डे त्वरित बुजविण्यात यावेत !

### ‘धर्मराज्य पक्षा’ची महापालिका आयुक्तांकडे मागणी

...पृष्ठ क्र. ९ वर



अंतरंग




नेमकं असच झालेलं आहे ना? आनंद शितोळे पृष्ठ क्र. ८



ज्योतिराव फुले: भारतीय इतिहासातील एक अद्वितीय व्यक्तिमत्व ...राजन राजे पृष्ठ क्र. ६



‘गांधी द्वेष आजही का उरतो? ...राजन राजे पृष्ठ क्र. १०

नीट पेपरफुटीमागे गुजराथ कनेक्शन! पृष्ठ क्र. १३

**मुलुंडमध्ये नवीन 'धारावी'ची उभारणी, हे राज्य सरकारचे पाप !**...पृष्ठ क्र. १ वरुन

**राजन राजे म्हणाले की, न्यायासाठी तुम्ही जरुर न्यायालयात जा. माझा चाळीस वर्षांचा अनुभव पणाला लावून सांगतो, तुम्ही रस्त्यावर एकदा–दोनदा आंदोलन करुन चालत नाही; आज जशी एकी तुम्ही दाखवताय, तीच चिकाटी तुम्हाला कायमची दाखवावी लागेल. ती जर तुम्ही नाही दाखवलीत; तर, तुम्हाला फक्त निकाल मिळेल, 'न्याय्य' मिळणार नाही. या सर्व सरकारी–दमनकारी यंत्रणा आहेत, त्यांना स्वतःची कुठलीही भूमिका नसते, ते डोकं वापरत नाहीत... वरुन जसा आदेश येतो, तसेच ते वागतात आणि म्हणून, इथून पुढे तुम्हाला कायम जागं राहणं गरजेचं आहे. इथून पुढे वेळप्रसंगी, जमेल त्या पद्धतीने आपण एकत्र येऊया... अन्यथा, आपल्या पुढच्या पिढीचं अस्तित्वच नष्ट होईल. आम्ही इथे कशासाठी आलोय? केवळ तुमचं आंदोलन यशस्वी व्हावं म्हणून नव्हे; तर, आंदोलनकर्त्या तरुणपिढीचा कुठेही भ्रमनिरास होऊ नये, त्यांना वैफल्य येऊ नये. आम्हाला कुठलंही मोठेपण नको, कुठलाही प्रोटोकॉल नको, आता उरलो फक्त उपकारापुरता, एवढीच आमची भावना आहे! अशा शब्दांत राजन राजे यांनी आपलं मनोगत व्यक्त करीत, मुलुंडकरांच्या आंदोलनाला सक्रीय पाठींबा दिला. याप्रसंगी, 'आपण सारे मुलुंडकर' या संस्थेचे ॲड. सागर देवरे आणि बँकिंग तज्ज्ञ तसेच, ज्येष्ठ विचारवंत विश्वास उटगी यांची समयोचित भाषणे झाली.** दरम्यान, आंदोलनानंतर, निषेध मोर्चातील प्रतिनिधींनी राजन राजे आणि विश्वास उटगी यांना सोबत घेत, खा. संजय दिना पाटील यांची भेट घेतली. यासंदर्भात आपण शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेणार असल्याचे त्यांनी आंदोलनकर्त्यांना सांगितले.



*'कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया' या पक्षाचे नेते तसेच, बँकिंगक्षेत्रातील तज्ज्ञ श्री. विश्वास उटगी आणि धारावी पुनर्वसन योजनेतील लढाऊ कार्यकर्ते व समाजसेवक ॲड. सागर देवरे यांनी, दि. ११ जुलै–२०२४ रोजी, 'धर्मराज्य पक्षा'च्या ठाणे कार्यालयात उपस्थित राहून, पक्षाध्यक्ष मा. राजन राजे यांची सदिच्छा भेट घेत, विविध विषयांवर सखोल चर्चा केली. यावेळी भारतीय अर्थव्यवस्थेपासून ते भारतातील कम्युनिस्ट चळवळीची सध्याची परिस्थिती, कामगार चळवळ आणि कंत्राटी–कामगारपद्धतीमुळे वाढलेली गुलामगिरी, यावर सखोल चर्चा करण्यात आली. आशिया खंडातील सर्वात मोठी झोपडपट्टी म्हणून, धारावी वसाहत ओळखली जाते. याच धारावीकरांना पुनर्वसनाच्या नावाखाली विस्थापित करण्याचा व गर्दीने श्वास कोंडलेल्या मुलुंड–परिसरात त्यांना नव्याने संस्थापित करण्याचा कट, राज्य शासनाकडून सुरु असून, धारावीची शेकडो एकर जमीन अदानीच्या घशात घालण्याचे शासकीय कारस्थान रचण्यात आले आहे....यासंदर्भात, तेथील संबंधित मुलुंडवासियांच्या वतीने ॲड. सागर देवरे यांनी प्रशासनाविरोधात आपला लढा दीर्घकाळ सुरु ठेवलेला आहे. आपल्या मुलुंडवासियांच्या लढ्याचे स्वरुप सांगतानाच, यासंदर्भात दि. २० जुलै–२०२४ (शनिवार) रोजी, कुर्ला येथे संपन्न होणाऱ्या बैठकीत, मा. राजन राजे आणि श्री. विश्वास उटगी यांनी उपस्थित राहण्याचे निमंत्रण ॲड सागर देवरे यांनी दिले. यावेळी बैठकीला उपस्थित राहण्याबरोबरच, 'धर्मराज्य पक्ष' व श्री. विश्वास उटगी यांची संघटना, धारावीकरांच्या लढ्यात सक्रिय सहभागी असेल, असा शब्द मा. राजन राजे यांच्याकडून देण्यात आला.*

## घोडबंदर सेवारस्त्याच्या विलीनीकरणाचा 'वादग्रस्त प्रकल्प'


...पृष्ठ क्र. १ वरुन

असलेले पदपथ काढून टाकणे म्हणजे, सर्वसामान्य करदात्या पादचाऱ्यांच्या मूलभूत हक्कांवर गदा आणण्यासारखे असून, पदपथ हे नागरिकांना चालण्यासाठी असतात. तेच काढून, एकप्रकारे नागरिकांचे जीवित धोक्यात आणण्याचा कट प्रशासनाकडून आखला जात असल्याचा थेट आरोप 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने करण्यात आला आहे. मुळात, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम–१९६६ नुसार, इमारत रेषा आणि नियंत्रण रेषा यांमधील अंतरे कलम–१५४ नुसार, सेवारस्ता (सर्व्हिस रोड) व महामार्ग एकत्र करणे हे, कायद्याचे उल्लंघन असतानादेखील, खुद्द राज्य शासनाकडूनच सुरक्षिततेसंबंधिचे नियम पायदळी तुडवले जात असल्याबाबत, पक्षाचे ठाणे लोकसभा अध्यक्ष महेशसिंग ठाकूर यांनी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त सौरव राव, ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई, ठाण्याचे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, ठाणे वाहतूक शाखेचे उपायुक्त विनयकुमार राठोड आणि 'एमएमआरडीए'च्या आयुक्तांना पत्र पाठवून आपला निषेध व्यक्त केला आहे. याप्रकरणी, 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने ठाणे महानगरपालिका प्रशासनाला, दि. २१/०२/२०२३ रोजी, पत्रव्यवहार (धराप/मनपाआ/ठामपा/ठाणे/२०२३/१२) करुन, सेवारस्ता (सर्व्हिस रोड) व महामार्ग एकत्र करण्याबाबत हरकत नोंदविण्यात आली होती. सदर पत्राची एक प्रत महाराष्ट्र राज्याच्या मुख्य सचिवांना रवाना करण्यात आली होती. त्यानंतर सुमारे वर्षभराच्या कालावधीनंतर, पुन्हा एकदा तत्कालीन ठामपा आयुक्त अभिजित बांगर, ठाणे वाहतूक शाखेचे उपायुक्त विनयकुमार राठोड आणि महाराष्ट्र राज्याच्या मुख्य सचिवांना पत्रव्यवहार करुन, नागरिकांच्या वित्तहानी व जीवितहानीचा विचार करताना, घोडबंदर सेवारस्त्याच्या (सर्व्हिस रोड) विलीनीकरणाची निविदा प्रक्रिया रद्द करण्याबाबतचा पत्रव्यवहार करण्यात आला होता.

दरम्यान, घोडबंदरच्या रस्त्याच्या मुख्य मार्गावरील वाहतूककोंडी व सर्व्हिस रोडवरील अतिक्रमणे टाळण्यासाठी, हे विलीनीकरण करण्यात येणार असल्याचे कारण 'एमएमआरडीए' प्रशासनाकडून देण्यात येत असले तरी, ते न पटण्यासारखे आहे. कारण, घोडबंदर मार्गावरील होणारी वाहतूककोंडी ही, मेट्रो प्रकल्पाच्या निर्माणाधीन कामामुळे होत आहे आणि त्याचा दोष मात्र, पदपथांवर टाकला जात आहे. शिवाय, सेवारस्त्यांवर (सर्व्हिस रोड) झालेले अतिक्रमण टाळण्यासाठी म्हणून, पदपथ काढून टाकणे हा प्रशासनाचा युक्तिवादही फसवा आहे. अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामे निष्कासित करणे ही, ठाणे महानगरपालिका प्रशासनाची जबाबदारी असताना, त्याकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष केले जात आहे. सर्व्हिस रोडवर केली जाणारी बेकायदेशीर पार्किंग हटविणे व त्या वाहनांवर कारवाई करणे हीदेखील वाहतूक शाखेची जबाबदारी असताना, त्याकडेही डोळेझाक केली जात आहे. त्यातच मेट्रो प्रकल्पाचे काम सुरु असल्याकारणाने, वाहतूककोंडीचा सामना वाहनचालकांना करावा लागत आहे. घोडबंदरची मुख्य मार्गिका अरुंद होणे, मेट्रो प्रकल्पाच्या कामांमुळे सर्व्हिस रोडची अवस्था वाईट असणे, याला सर्वसामान्य कष्टकरी–करदाते ठाणेकर नागरिक जबाबदार नसून, ठाणे महानगरपालिका प्रशासन आणि ठाणे वाहतूक शाखा हेच संयुक्तपणे जबाबदार आहेत. संतापजनक बाब म्हणजे, घोडबंदर मार्गावरील सदर सेवारस्ता (सर्व्हिस रोड) विलीनीकरण प्रकल्प, कोणत्याही नियोजनाशिवाय पूर्ण करण्याचा घाट प्रशासनाकडून घातला जात असल्याने, या प्रकल्पाचा पुनर्विचार करण्यात यावा अशी आग्रही मागणी ठाणेकर नागरिकांकडून, विशेषतः घोडबंदरवासियांमार्फत सातत्याने करण्यात येत आहे. असे असतानाही, नागरिकांच्या सुविधेसाठी व सुरक्षिततेसाठी असणारे पदपथ विलीनीकरणाच्या नावाखाली तोडले जात असतील तर, 'धर्मराज्य पक्ष' सनदशीरमार्गाने जनआंदोलन उभे केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही. परिणामी, घोडबंदर सेवारस्त्याच्या (सर्व्हिस रोड) विलीनीकरणास आमचा ठाम विरोध असून, संबंधित ४०० कोटींचा 'वादग्रस्त प्रकल्प' तात्काळ रद्द करण्यात येऊन, ठाणेकर नागरिकांच्या आणि पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी ठोस उपाययोजना अमलात आणावी, अशी आग्रही मागणी करतानाच, ठाणेकर नागरिकांच्या दुर्दैवाने जर, सेवारस्त्याच्या (सर्व्हिस रोड) विलीनीकरणाचा प्रकल्प होऊ घातला आणि त्यानंतर, या महामार्गावर एखादी जीवितहानीची दुर्घटना घडलीच; तर, त्यास सर्वस्वी संबंधित प्रशासकीय अधिकारी आणि संबंधित लोकप्रतिनिधी जबाबदार असतील, असा गंभीर इशारादेखील 'धर्मराज्य पक्षा'चे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष महेशसिंग ठाकूर यांनी, आपल्या पत्राद्वारे दिला आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात कचऱ्याचे साम्राज्य !

## ‘धर्मराज्य पक्षा’ची थेट जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार...



**ठाणे (प्रतिनिधी) :** ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात कचऱ्याचे साम्राज्य निर्माण झालेले असून, यामुळे प्रचंड दुर्गंधी पसरुन, रोगराई पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही. जिल्हाधिकारी कार्यालयाव्यतिरिक्त, याच परिसरात असणाऱ्या शिधावाटप कार्यालयाच्या दारातच कचऱ्याचे ढिगारे साचलेले असून, याचा अभ्यांगतांना मोठ्याप्रमाणात त्रास होत आहे. या कचऱ्यातून निर्माण झालेल्या दुर्गंधीमुळे, रोगराई पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने, साचलेल्या कचऱ्यावर डासांचे प्रमाण वाढलेले आहे. परिणामी, डेंग्यू आणि मलेरिया या आजारांची लागण होण्याचा धोका जास्त आहे. संतापजनक बाब म्हणजे, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारातच महाराष्ट्र शासनाचे राष्ट्रीय हिवताप प्रतिरोध योजना, ठाणे जिल्हा यांचे कार्यालय याच ठिकाणी असून, दुर्दैवाने या कार्यालयात कोणीही संबंधित अधिकारी उपस्थित नसल्याची बाब ‘धर्मराज्य पक्षा’च्या निदर्शनास आलेली आहे. पावसाळ्याच्या दिवसांत साथीचे आजार मोठ्याप्रमाणात उद्भवत असतात. त्यातच ठाणे शहर आणि जिल्ह्यात, डेंग्यूचे रुग्ण आढळून आल्याचे वृत्त, प्रसिद्धीमाध्यमांतून प्रकाशित झालेले असताना, या पार्श्वभूमीवर, खुद्द ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारातच कचऱ्याचे साम्राज्य निर्माण होणे, हे प्रशासनाला नक्कीच भूषणावह नाही. तरी, याप्रकरणी गांभीर्याने दखल घेत, रोगराईला आमंत्रण देणारे, कचऱ्याचे ढिगारे त्वरित काढून टाकण्यात येऊन, स्वच्छता राखावी आणि नागरिकांच्या आरोग्याची काळजी घ्यावी, अशी विनंती ‘धर्मराज्य पक्षा’चे सहसचिव नरेंद्र पंडित यांनी, ठाण्याचे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्याकडे एका लेखी पत्राद्वारे केली आहे.

जो देशाच्या या टोकाकडून त्या टोकाकडे हजारो किलोमीटर चालत जातो, रस्त्यावरच्या चर्मकाराच्या टपरीवर बसून सहज चप्पल शिवू लागतो, जिथे आकांत चालू आहे तिथे धावत जाऊन सांत्वन करतो, कितीतरी धाब्यांवर सहज चहा पितो, वृद्धापासून मुलांपर्यंत प्रत्येकाला कवेत घेतो. अगदी लहान मुलाला आपली पापी घेऊ देतो, बहुतेक वेळा टी शर्टात वावरतो, कुणाच्याही प्रश्नांना उत्तरे देतो, तज्ज्ञांकडून गोष्टी वेळोवेळी समजावून घेतो तो ‘शहजादा’, तो ‘युवराज’.

**...आणि करोडो रुपयांच्या विमानातून किंवा अत्यंत महागड्या व सुरक्षित कारमधून फिरतो, रोज अनेकदा अत्यंत महागडे कपडे घालतो व ते दिवसातून अनेकदा बदलतो, कुणी तज्ज्ञ भेटला की त्याला आपलंच ऐकवतो, निवडक पत्रकारांसमोर स्वगते उधळतो पण अडचणीत आणू शकतील अशा पत्रकारांना चुकून सामोरा जात नाही तो ‘फकीर’!**

**बात कुछ हजम नहीं होती**

– *अनंत घोटगाळकर/FB (समाजमाध्यमातून साभार...)*



**भांडवलशाहीतल्या या कृष्णछायेला धरुन काही ‘धवल रंगछटा’, पावसाळी काळ्याकुट्ट नभात चमकणार्या विद्युल्लतेसारख्या अधूनमधून प्रस्फुटित होत रहातात...जनसामान्य, अवमानित जिण्याने खाली गेलेली आपली मान, मोठ्या कष्टाने उंचावून, आशेने त्या चमचमत्या ‘धवलछटां’कडे अनिमिष नजरेनं पहात रहातात...त्यात कुणाचे वैयक्तिक (शिक्षण, खेळ, कला इ. क्षेत्रात) वा कुण्या गावचे सामुदायिक (हिवरेबाजार, राळेगणसिद्धी इ.) पराक्रम-विक्रम, व्यवस्थेने नैसर्गिक अथवा मानवनिर्मित संकटात अपवादाने केलेले महत्कार्य व त्यातून, मोजक्या लोकांना का होईना, मिळालेला मोठा दिलासा वगैरे प्रसारमाध्यमांतून प्रचारकी थाटात पेश केलेलं ते अचंबेनं पहात रहातात. त्यातून, प्रत्येक मध्यमवर्गीय घरात पुढच्या पिढ्यांवरचा शिक्षण-प्रशिक्षणाचा दबाव वाढत जातो.**

***...राजन राजे*** (भाई)



THE HINDU

**Hindenburg refutes SEBI's allegations on its Adani short bet**

Hindenburg says a Kotak Mahindra Bank unit oversaw an offshore fund used by its 'investor partner' to short Adani shares; says it made $4.1 mn

Reuters

Hindenburg Research refuted allegations on Monday from India's SEBI accusing the company of colluding with a U.S. asset manager to use non-public information to set up its short bet against Adani Group last year.

In a statement posted on its website, U.S.-based short-seller Hindenburg shared a copy of a 46-page show cause notice from the Securities and Exchange Board of India (SEBI) outlining the allegations that six entities including Hindenburg, asset manager Kingdon Capital Management and a Mauritius-based fund set up by Kotak Mahindra Bank violated certain rules under the Prevention of Fraud and Unfair Trade Practices regulation.

The allegations, if proven, could result in monetary penalties and the payback of any illegal gains.

Hindenburg termed the notice as "nonsense" and an attempt to silence and intimidate by alleging that Hindenburg's report contained misrepresentations and inaccurate statements meant to mislead readers.

"In our view, SEBI has neglected its responsibility, seemingly doing more to protect those perpetrating fraud than to protect the investors being victimised by it," Hindenburg said.

The disclosure of the SEBI notice adds a new twist in the saga that began last year when Hindenburg, founded by Nathan Anderson, alleged improper business dealings by Adani.

Adani, which refuted the allegations, suffered a loss of as much as $150 billion in combined market value after the report, but has since rebounded.

In its notice, SEBI alleges Hindenburg colluded with its client Kingdon Capital Management by providing a draft of its report on Adani before it was released publicly.

SEBI alleges that Mark Kingdon, the owner of Kingdon Capital, then set up a fund able to trade Indian equities known as K Indian Opportunities Fund (KIOF). That fund created short positions in Adani stocks between January 10, 2023, and January 20, 2023, five days ahead of the Hindenburg report being published, according to the SEBI documents.

In its statement, Hindenburg said a Mauritius registered unit of Kotak Mahindra Bank created and oversaw an offshore fund that was used by its "investor partner" to bet against Adani's shares.

The positions were squared off in February, leading to gains of $22.25 million, SEBI alleged.

Hindenburg said it made $4.1 million in gross revenue through "gains related to Adani shorts from that investor relationship" and just $31,000 through its short position of Adani's U.S. bonds. It did not name the investor.

"Kotak Mahindra International Ltd. (KMIL) and KIOF unequivocally state that Hindenburg has never been a client of the firm," a KMIL spokesperson said.

Joins issue

U.S.-based short-seller Hindenburg terms SEBI show-cause notice to it as 'nonsense', an attempt to silence and intimidate

- SEBI says 6 entities including Hindenburg, Kingdon Capital and a Mauritius-based fund set up by Kotak Mahindra Bank violated rules
- Hindenburg made $4.1 mn gross revenue in 'gains related to Adani shorts' via an investor relationship
- Kotak backed fund asserts Hindenburg 'has never been a client'

**‘सेबी’ने** कागदी घोडे नाचवताच...पुन्हा एकवार, गौतम अदानीच्या कथित कंपनी-गैरव्यवहारासंदर्भात ‘सेबी आणि हिंडेनबर्ग’...समोरासमोर उभे ठाकलेत आणि यासंबंधाने, ज्या वृत्तपत्रीय बातम्या झळकल्या, त्याचे नमुने पाहिल्यावर... ‘‘स्वतंत्र बाण्याची व खऱ्याअर्थाने ‘लोकशाहीचा चौथा स्तंभ’ असलेली पत्रकारिता (उदा. ‘THE HINDU’) आणि ‘गोदी-मिडीया’ची पत्रकारिता’’, यातला दोन टोकांचा फरक आपसूकच स्पष्ट होतो!

**सेबीने गुपचूप पाठवलेल्या नोटीशीला, जाहीरपणे सणसणीत उत्तर हिंडेनबर्गने दिलेलं असूनही...‘गोदी-मिडीया’तून काय चित्र उभं केलं जातंय, ते बघण्यासारखं आणि जागरुक-जागृत नागरिकाला त्यातून, शिकण्यासारखं खूप काही आहे; पण, त्यासाठी, ‘THE HINDU’सारखी वृत्तपत्रे आणि ‘‘रवीशकुमार, प्रसून बाजपेयी, संजय शर्मा, दीपक शर्मा, दिनेश गोस्वामी, अजित अंजुम, निलू व्यास, अशोक वानखेडे, निखिल वागळे यासारखे पत्रकारितेचं ‘सतीचं वाण’ हाती घेतलेले पत्रकार हवेत; ‘मेंदूविक्या’ भाडखाऊ पत्रकारांचं ते काम नोहे’’...!!!**

सेबीने ही सार्वजनिक स्वरुपात माहिती द्यावी/ब्लूमबर्ग कोटक-महिंद्राला सेबी वाचवू पहातेय का?/ फक्त, ३१,००० डॉलर्स कमावलेत/सरकारी-उद्योगांचे १०६ पानांचा अहवाल

‘द हिंदू’ (THE HINDU)च्या बातमीवर Gajanan Pathare (गजानन पाठारे, ठाणे...९८९२०७६०२६): यांची आलेली एक मार्मिक-प्रतिक्रिया खालीलप्रमाणे...)

‘‘बकरीने वाघालाच आव्हान दिलं; असं कधि ऐकलयं आपण?...तर, ऐकाच (खरं म्हणजे, पहाच) ‘सेबी’ (SEBI) नावाची देशी ‘बकरी’, हिंडेनबर्ग नावाच्या विदेशी ‘वाघा’ला आव्हान देतेय...कमाल म्हणजे, इधे वाघाने अजिबात न चिडता; बकरीला तिची औकात दाखवली...आता, बकरी बँ बँ करतेय’’...!!!

# कळवा रुग्णालयातील २१ नवजात बालकांचा दुर्दैवी मृत्यू, हा ठामपा प्रशासनाचा हलगर्जीपणा ! - धर्मराज्य पक्षाचा आरोप

**ठाणे (प्रतिनिधी) :** ठाणे महानगरपालिकेच्या कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात, जून महिन्यात २१ नवजात बालकांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याचे वृत्त, सर्वच प्रसिद्धीमाध्यमांत प्रकाशित झाले आहे. ही घटना अतिशय दु:खद आणि तितकीच संतापजनक अशी आहे. नवजात बालकांच्या मृत्युंमुळे, रुग्णालय प्रशासनाचा ढिसाळ कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला असून, रुग्णालयात रुग्णसेवेचे कर्तव्य बजावणाऱ्या डॉक्टर्स आणि कर्मचाऱ्यांच्या विश्वासार्हतेबाबत प्रश्नचिह्न निर्माण झाले आहे. **ठामपा प्रशासनाच्या आरोग्यसेवेचा उडालेला बोजवारा तसेच, रुग्णालयातील डॉक्टर्स-कर्मचाऱ्यांचा हलगर्जीपणाच, निष्पाप नवजात बालकांच्या मृत्यूस कारणीभूत असल्याचा ठाम आरोप 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त सौरव राव यांना पाठविण्यात आलेल्या पत्रात करण्यात आला आहे. दरम्यान, छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात, जून महिन्यात एकूण ५१२ महिला प्रसूतीसाठी आल्या होत्या. त्यापैकी २९४ गर्भवतींचे सीझर करण्यात आले होते. तर, ९० बालकांचा जन्म अतिदक्षता विभागात झाला होता. त्यापैकी २१ नवजात बालकांचा मृत्यू झाला असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिलेली आहे.** याच रुग्णालयात, गेल्या वर्षी एकाच दिवशी १८ जणांचा मृत्यू झाल्याच्या घटनेने अवघा महाराष्ट्र हादरलेला असतानाच, आता रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात, जून महिन्यात २१ नवजात बालकांचा दुर्दैवी मृत्यू होणे, ही बाब रुग्णालयाच्या विश्वासार्हतेबाबत शंका उपस्थित करणारी आहे. ठाणे महानगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात, उपचारांच्या चांगल्या सोयीसुविधा मिळतील, त्याचप्रमाणे सर्वसामान्य गोरगरीब जनतेसाठी आर्थिकदृष्ट्या सोयीस्कर पडेल, या भाबड्या आशेपोटी जिल्ह्याच्या शहरी, ग्रामीण आणि दुर्गम आदिवासी भागांतून रुग्ण उपचारासाठी दाखल होत असतात. याच दृष्टीकोनातून जून महिन्यात बाळंतपणासाठी गर्भवती महिला मोठ्याप्रमाणात दाखल झाल्या होत्या. मात्र, या अभागी महिलांना मातृत्वसुखापासून वंचित ठेवण्याचे पाप ठाणे महानगरपालिका प्रशासनाकडून घडलेले आहे, ज्याचा 'धर्मराज्य पक्षा'ने तीव्र शब्दांत निषेध व्यक्त केला आहे. **यासंदर्भात, 'धर्मराज्य पक्षा'चे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष महेशसिंग ठाकूर यांनी, आयुक्तांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की, गेल्या वर्षी एकाच दिवशी १८ रुग्णांचा मृत्यू झाल्यानंतर, 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, राज्याचे मुख्य सचिव आणि तत्कालीन ठामपा आयुक्त यांना पत्रव्यवहार करुन, छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाच्या अनागोंदी कारभारची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी केली होती. त्यावर, महाराष्ट्र शासनाने चौकशी समिती नेमली होती; परंतु, त्याचा अहवाल जाहीर करण्यात आला नाही.** दुसरी महत्त्वाची बाब अशी की, ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मुंब्रा-कौसा येथे, महापालिकेचे रुग्णालय दोन वर्षांपूर्वीच बांधून तयार असूनही, ते अद्याप कार्यान्वित करण्यात आलेले नाही. परिणामी, याचा संपूर्ण भार हा, छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयावर पडत असतो. रुग्णांचा वाढता लोंढा यामुळेच, रुग्णालय प्रशासनावर अतिरिक्त ताण येऊन, त्याचे दुष्परिणाम मात्र, गोरगरीब रुग्णांना भोगावे लागत आहेत. तरी, याप्रकरणी ठाणे महानगरपालिका प्रशासनाने गांभीर्याने दखल घ्यावी आणि २१ नवजात बालकांच्या दुर्दैवी मृत्यूबाबत, संबंधित डॉक्टरांची सखोल चौकशी करुन, दोषींवर योग्य ती कायदेशीर करावी; अन्यथा, ठाणे महानगरपालिका प्रशासनाविरोधात 'धर्मराज्य पक्ष' आंदोलन उभे करेल, असा इशारा महेशसिंग ठाकूर यांनी, आयुक्तांना पाठविलेल्या पत्राद्वारे दिला आहे.

# ठाणे शहरातील स्वाईन फ्ल्यूच्या प्रादुर्भावासंदर्भात, महापालिका प्रशासनाने कठोर पाऊले उचलावीत !

**'धर्मराज्य पक्षा'ची आयुक्तांकडे मागणी**

**ठाणे (प्रतिनिधी) :** ठाण्यात स्वाईन फ्ल्यूचे (H1-N1) रुग्ण, दिवसेंदिवस वाढत असल्याची धक्कादायक माहिती, प्रसिद्धीमाध्यमांद्वारे समोर आली आहे. गेल्यावर्षी (वर्ष-२०२३) संपूर्ण पावसाळ्यात ८७ रुग्ण आढळले होते. मात्र, यावर्षीच्या ९ जुलैपर्यंत स्वाईन फ्ल्यूच्या रुग्णांची संख्या ७० इतकी आढळून अल्यानंतर, पुढच्याच आठवड्यात ती १३१ इतकी वाढल्याची चिंताजनक बाब समोर आली आहे. यासंदर्भात, ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त सौरव राव यांना 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने पत्र पाठवून चिंता व्यक्त करण्यात आली आहे. याबाबत, महापालिकेच्या कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात, स्वाईन फ्ल्यूच्या रुग्णांसाठी स्वतंत्र आयसोलेशन विभाग तयार करण्यात आल्याची माहिती, माहिती आणि जनसंपर्क अधिकारी रवींद्र मांजरेकर यांनी दिली आहे. मात्र, यापार्श्वभूमीवर 'धर्मराज्य पक्षा'चे सहसचिव नरेंद्र पंडित यांनी, महापालिका आयुक्तांना पत्र लिहून सूचित केले आहे की, गेल्या वर्षी (ऑगस्ट-२०२३) कळवा रुणालयात एकाच रात्री, तब्बल १८ रुग्णांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली होती. या दुर्घटनेमुळे महाराष्ट्र हादरलेला असतानाच, गेल्या महिन्यात (जून-२०२४) सुमारे २१ नवजात बालकांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडलेली असल्याने, छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय प्रशासनाचा हलगर्जीपणा उघड होऊन, महापालिकेच्या आरोग्य विभागाची लक्तरे यामुळे वेशीवर टांगली गेलेली आहेत. सबब, याबाबत सदर रुग्णालय प्रशासनावरील विश्वासार्हता डळमळीत झालेली आहे, याकडे महापालिका प्रशासनाचे पत्राद्वारे लक्ष वेधण्यात आले आहे. वर्ष-२००९मध्ये स्वाईन फ्ल्यू हा आजार समोर आला तेव्हा, जगभरात एकच खळबळ उडाली होती. भारतातही अनेकांना या आजाराची लागण झाली होती. त्यामुळे काळजी घेणे आवश्यक असून, महापालिका प्रशासनाने ठाणेकर नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी, मास्कचा वापर करण्यासंदर्भात गांभीर्याने सूचना द्याव्यात, त्याचबरोबर खोकताना किंवा शिंकताना तोंडावर रुमाल ठेवणे, हात वारंवार स्वच्छ पाण्याने धुवावेत, याबद्दल प्रशासकीय स्तरावर जनजागृती करण्यात यावी, अशी विनंती नरेंद्र पंडित यांनी आयुक्तांना केली आहे.

दरम्यान, स्वाईन फ्ल्यू हा एक संसर्गजन्य आजार असून, H1-N1 या व्हायरसमुळे त्याची लागण होते. २००९ साली, थकक्ष या आंतराष्ट्रीय आरोग्य संघटनेने हा रोग संसर्गजन्य असल्याचे जाहीर केले होते. हा आजार केवळ माणसांमुळेच नव्हे; तर, प्राण्यांमुळेदेखील होतो. याच अनुषंगाने ठाणे शहरात शेकडो भटके श्वान, मांजरी रस्त्यावर फिरत असतात. त्यांपैकी बहुतांश प्राणी हे आजारी-रोगट असल्याचे आढळून येते. त्यामुळे प्रथमदर्शनी अशा भटक्या प्राण्यांचा बंदोबस्त होणे अत्यंत गरजेचे आहे. ज्या व्यक्तीला स्वाईन फ्ल्यूची लागण झाली असेल, तो शिंकला अथवा खोकला तर, त्यातून या आजाराचे विषाणू हवेत पसरतात. याचे विषाणू हवेत ८ तासांपर्यंत जिवंत राहू शकतात. या विषाणूंचा निरोगी व्यक्तीच्या डोळे, नाक, तोंड अथवा त्वचेशी संपर्क आला तर, विषाणूंचे संक्रमण होऊन, त्या व्यक्तींलाही स्वाईन फ्ल्यूची लागण होते. ताप येणे, थंडी-हुडहुडी भरणे, सर्दीमुळे नाक वाहणे, खोकला, घसा खवखवणे, घसा दुखणे, अंगदुखी, डोकेदुखी, पोटात दुखणे, उलटी-मळमळ यांसारखी लक्षणे दिसून येतात. विशेष म्हणजे, ६५ वर्षांवरील नागरिक, लहान मुले, गर्भवती महिला, मधुमेह आणि किडनीचे आजार असणाऱ्यांना स्वाईन फ्ल्यूची लागण होण्याचा धोका जास्त असतो. याच पार्श्वभूमीवर ठाणे महानगरपालिका प्रशासनाने, स्वाईन फ्ल्यू या संसर्गजन्य आजाराचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी महापालिका क्षेत्रातील, विशेषतः झोपडपट्टी परिसर आणि गर्दीच्या ठिकाणी अधिक सतर्कता बाळगावी. कोव्हिड काळात, ज्या रुग्णांना कोरोना आजाराची लागण झाली होती, त्यांच्यात आढळणारी लक्षणे आणि स्वाईन फ्ल्यू आजारात आढळणारी लक्षणे यात साम्य असल्यामुळे, मधुमेहाचे रुग्ण व गर्भवती महिलांची अधिक काळजी घेण्याची जबाबदारी ही महापालिका प्रशासनाची आहे, हे क्रमप्राप्त ठरते. तरी, याप्रकरणी ठाणे महानगरपालिका प्रशासनाने कठोर पाऊले उचलून ठोस उपाययोजना राबवावी, अशी आग्रही विनंतीवजा मागणी 'धर्मराज्य पक्षा'चे सहसचिव नरेंद्र पंडित यांनी, ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त सौरव राव यांच्याकडे आपल्या पत्राद्वारे केली आहे.

# नेमकं असंच झालेलं आहे ना ?

## ईडीच्या नोटीसा आल्या म्हणून, बंड झालं हे अर्धसत्य आहे.
## बंड करायला प्रवृत्त व्हावं, दुसरा मार्गच दिसू नये म्हणून, नोटीसा आल्यात...



*समाजमाध्यमातून साभार*

आस्तेकदम सगळ्या बाजूनी कुंपण लावून मंडळी जाळ्यात अडकवली गेलीय.

''संघाचं स्वातंत्र्यलढ्यात असणारं योगदान काय?'' असा प्रश्न विचारला तेव्हाच उद्धव ठाकरेंचं सरकार आणि राजकारण संपवण्याचा आटोकाट आणि कुठल्याही थराला जाऊन संघ प्रयत्न करणार हे नक्की ठरलेलं होतं. कशासाठी?

**पहिली बाब.**

**फडणवीस काळात गृहमंत्रालय त्यांच्याकडे होतं, त्यांच्या काळाच्या सुरुवातीला जज लोयांचा मृत्यू झाला. पाच वर्षांत फडणवीसांनी गृहखातं कुणालाही दिलं नाही. नंतर आलेल्या गृहमंत्र्यांना ईडीचा फास बसला. सतीश उके वकिलांनी त्याबद्दल शब्द काढला, फडणवीसांच्या निवडणूक शपथपत्राची केस काढली, उकेंवर ईडीची संक्रांत आली. अमित शहांचा राजकीय पटलावर मागची झेंगट बाजूला काढून गृहमंत्री म्हणून प्रवास नंतर सुरु झाला. तरीही महाराष्ट्र पोलिसांकडे किंवा गृहखात्याकडे असणाऱ्या महत्त्वाच्या माहितीची टांगती तलवार आहेच. महाराष्ट्राची सत्ता हातात ठेवण्याचं एक महत्त्वाचं कारण हे आहे. कदाचित इच्छा नसूनही फडणवीसांची मदत अमित शहा या कारणासाठी करत असावेत.** या बाजूला असणारा अजून एक कोन म्हणजे समृद्धी , जलयुक्त शिवार, चिक्की सारख्या अनेक बाबी फडणवीसांना सतत अस्वस्थ करणाऱ्या आणि त्यांची कथित स्वच्छ राजकारणी इमेजच्या चिंधड्या करणाऱ्या आहेत, या बाबी दाबून टाकायला सत्तेची कवचकुंडले गरजेची.

**दुसरी बाब.**

आर्थिक, औद्योगिक पातळीवर महाराष्ट्र अग्रेसर आहे, तिथून मिळणारा महसूल महत्वाचा आहे. सगळ्याच प्रकारचा. स्वातंत्र्यपूर्व काळापासून राजकीयदृष्ट्या सजग असणारी राज्य किंवा प्रांत अशी ओळख असणारे भाग महाराष्ट्र, बंगाल, बिहार आणि पंजाब. संघाच्या सरसकटीकरणाराला विरोधाचा झेंडा उभा राहू नये यासाठी इथली सत्ता महत्वाची. **संघाच्या विरोधातली राजकीय आघाडी उभी झाली; तर, सगळ्या प्रकारची, कार्यकर्ते, आर्थिक, वैचारिक रसद पुरवू शकणारे पक्ष आणि नेते म्हणजे ठाकरे आणि पवार. त्यांच्या सत्तेची कवचकुंडलं काढून टाकायची धडपड त्यासाठी.**

**तिसरी बाब.**

हिंदुत्ववादी पक्ष म्हणून ओळख असणारे पक्ष दोनच आहेत. सेनेला फोडणे, बदनाम करणे, विस्कळीत करणे आणि शक्तिपात घडवून आणणे संघाला अनिवार्य आहे. पहिल्या युतीचा उद्देश तेव्हापासूनच तो होता, आता तो मूर्त स्वरुपात दिसायला लागलेला आहे. हिंदुत्वाचा ब्रँड आणि मतपेटी फक्त आपल्या खिशात पाहिजे यासाठी ही सगळी धडपड.

**चौथी बाब**

मोदी शहा आणि संघाला राज्यांच्या निवडणुकांपेक्षा २०२४ ची निवडणूक जास्त महत्वाची वाटते. पाकिस्तान-पुलवामा-चीन यांचं सरप्राईज एलेमेंट संपलेलं आहे. लोकांना हा खेळ करणार हे ठाऊक आहे. महाराष्ट्रात असणारी खासदारांची संख्या मोठी आहे. निवडणुकीत सगळ्याच बाबींचं व्यवस्थापन करायला स्थानिक सत्ता हातात असणे गरजेचे आहे.

या बाबींचा विचार करता कोर्टकज्जे होऊन भलेही महिना लागेल पण, आघाडी सरकारला भाजप पाडणार आणि सत्तेत येणार.

**बंड करणारी मंडळी ओटीपी आहेत (ज्येष्ठ पत्रकार अभय दुबे यांचा शब्द) वन टाईम पासवर्ड टाकला की, आपण डिलीट करून टाकतो. हवं तर ज्योतिरादित्य, पाचपुते, कोल्हे, विखे, हर्षवर्धन, राणे कुणालाही विचारा. आपल्यामागे ईडी नाहीये हाच त्यांच्यासाठी मोठा बहुमान आहे. आपण राजकारणात आहोत, एवढंच समाधान यापुढे बंडकरी मंडळींना राहील.**

**उद्धव ठाकरेंनी वापरलेली म्हण अचूक होती, 'कुऱ्हाडीचा दांडा, गोतास काळ' सरकार स्थापन झालं, नव्या गटाच्या चौकटीत बंडकरी अडकले की त्यांची उपयुक्तता शून्य होईल. हे आज त्यांना कदाचित उमजलेल असेलही; पण, परतीचे दोर कापले गेलेले आहेत.**

**महाराष्ट्र धर्माची लढाई यापुढे फक्त आघाडीची उरलेली नाही. महाराष्ट्र धर्म ज्यांना समजतो त्या प्रत्येकाची आहे.**

**उत्तरेचं आक्रमण थोपवण्याची कुवत आणि हिंमत फक्त महाराष्ट्राची आहे, मात्र ही लढाई फक्त राजकीय नाही किंवा राजकीय नेत्यांची पक्षाची नाही; तर, अजित डोभाल यांच्याच भाषेत तितकीच गंभीर आणि सर्वंकष अशी सिव्हील सोसायटीची सुद्धा आहे.**

हिंदीभाषिक गायपट्टा भाषिक, सांस्कृतिक, राजकीय आक्रमण करत असताना, आपण मराठी भय्ये, भय्यीन बनून राहायचं की महाराष्ट्र धर्म टिकवायचा आपला प्रश्न आणि निर्णय.

*...आनंद शितोळे*

# ज्योतिराव फुले: भारतीय इतिहासातील एक अद्वितीय व्यक्तिमत्व



**११ एप्रिल १८२७ रोजी, सावतामाळी या शूद्र जातीतल्या 'गोऱ्हे' कुटुंबात गोविंदराव व चिमणाबाईंच्या पोटी समतेची आणि सत्यशोधनाची 'ज्योत' घेऊन 'ज्योति'राव जन्माला यावा आणि त्याच दिवशी पुण्याच्या पेशवाईचा (जरी, पेशवाई १८१८ साली राजकीयदृष्ट्या शनिवारवाड्यावर 'युनियन जॅक' फडकावून इंग्रजांनी संपुष्टात आणली होती) 'मेरुदंड' असलेला शनिवारवाडा आगीत जळून पूर्णतया भस्मसात व्हावा... हा नियतीचा एक अजब, विलक्षण 'संकेत' असला; तरीही, म. ज्योतिबा फुल्यांनी आयुष्यभर ब्राह्मणांचा द्वेषच केला, हे असं म्हणायचं; तर मग, ''ख्रिस्त, महंमद, मांग, ब्राह्मणासी धरावे पोटासी बंधू परी'', हे असं कुणी लिहीलं?**

स्वत:च्याच घरातील विधवा, निराधार ब्राह्मण स्त्रियांवर चार भिंतीत अत्याचार केल्या गेलेल्यानंतरची त्यांची बाळंतपणं कुणी केली? त्यांनी स्वत: दत्तक घेतलेला मुलगा 'यशवंत' कोण होता? जोतिबा आणि सावित्रीमाई यांना शेणगोटे कुणी मारले? ते मारणाऱ्या एखाद्याचा तरी ज्योतिराव-सावित्रीमाईंना मिळून मरणाचा द्वेष असता; तर, त्यांना 'धडा' शिकवण्यासाठी फुलेंनी एक तरी 'नथ्थ्या' तयार नसता केला का?

....ते तर, त्यांना सहजशक्य होतं. बालपणी आईवडिलांकडून मुलं जगावीत म्हणून, काही नवस बोलला गेल्याने, बायकी वळणाचा पोषाख, 'नथ' घातला जाणारा म्हणून 'नथुराम'... म्हणूनच, हे असं विचित्र नाव, त्यापूर्वी किंवा त्यानंतर ते तसं नाव, कुठेही आढळत नाही. त्यामुळे, बालपणापासूनच एका न्यूनगंडाने पछाडला गेलेला तो नथ्थू, आपला 'पुरुषार्थ' नि:शस्त्र महात्म्याची हत्या करुन सिद्ध करता झाला, असा एकूण प्रवाद आहे. तेव्हा, त्या नराधमाच्या नावात 'रामा'चा उच्चार तरी कशासाठी व्हावा?

असो, म. फुलेंचा विचार केवळ ब्राह्मणेतर नजरेने पाह्यला जाऊ नये; खरंतर, तो 'फुले-विचार' म्हणजे, सर्व जातीजमातींच्या भल्यासाठी असलेलं सर्वंकष 'सत्यशोधकी तत्त्वज्ञान'च होय. फुले-दांपत्य केवळ, महिला-शाळांपुरतेच मर्यादित नाही... ते त्यापलिकडे कितीतरी व्यामिश्र पसरलेले आहे. प्रथमतः शिवरायांची समाधी शोधणारे व शिवजयंत्योत्सव साजरा करणारे किंवा पहिलं शिवचरित्र लिहिणारे व पोवाडा गाणारे, ते म. फुले... इथपर्यंत आपला फुले-परिचय बहुधा मर्यादित असतो; पण, २८ नोव्हेंबर-१८९० या दिवशी महात्मा फुले वारले आणि त्यानंतर, शिवछत्रपतींचा खरा इतिहास आपल्याला पारखा झाला, हे आपण नीट समजावून घेत नाही! आपल्या राजाचा उत्तुंग इतिहास दडपून ठेऊन राजकीय सोयीनं खोट्या इतिहासाची मांडणी... प्रवचनं, पोवाडे आणि पुस्तकांच्या रुपाने जी, म. फुल्यांच्या मृत्यूनंतरच एकदा सुरु झाली, ती दुर्दैवाने, बहुजनांच्या आळसामुळे व अभ्यस्त न रहाण्यामुळे आजही सामाजिक-राजकीय पीडा थांबायला तयार नाही!

**''फुले वॉज फर्स्ट ऑब्जेक्टिव्ह रिव्हॉल्युशनरी ऑफ इंडिया, आफ्टर गौतम बुद्ध'', असं एका मोठ्या राजकीय विचारवंतानं १९४५ सालीच लिहून ठेवलंय.**

**''फुले, हे ऑब्जेक्टिव्ह मटिरियल रियालिटी''त स्वत:ला गाडून घेऊन रचनात्मक काम करणारे होते. खरंतरं, साम्यवाद्यांनाही असं जमिनीवरचं काम करुन, ते मुठीत पक्कं धरुन ठेवता आलं असतं... पण, ते तसं ठेवायला त्यांच्या अतिरेकी पोथीनिष्ठतेमुळे व अव्यवहार्य भूमिकेमुळे त्यांना जमलं नसावं. त्यामुळेच, देशात ढोंगी, बेगडी 'हिंदुत्वा'च्या बिरुदाखाली 'उजव्या' विचारसरणीच्या लोकांचं चांगलंच फावलं... आणि, त्यातूनच, महाराष्ट्रात मराठी माणसाचा 'अवसानघात' करणारे 'उजव्या' विचारसरणीचे राजकीय पक्ष आणि संघटना फोफावू शकल्या (ज्या, मराठी माणसांच्या नावाने जन्मल्या, वाढल्या आणि त्यांचाच, विश्वासघात करत्या झाल्या)!**

**सद्यस्थितीत, शाहू, फुले, टिळक, गांधी, नेहरु, पटेल, आंबेडकर, सुभाषचंद्र बोस इ. प्रत्येक महापुरुषाच्या नावाने अनेकांनी आपली राजकीय-दुकाने व्यवस्थित थाटलेली आहेत आणि ती आजच्या कोविड-१९ व त्याच्या विविध उत्परिवर्तित विषाणूजन्य साथीच्या काळातही जोरात चालू आहेत. त्यातली अनेक राजकीय दुकाने, 'फुले-दांम्पत्या'च्या पुण्याईचा गैरवापर करुन आजही तुफान चाललीयत. त्यामुळेच, या एकूणच महापुरुषांसंबंधाने जाणिवपूर्वक निर्माण केले गेलेले सगळे वाद... वैचारिक वगैरे अजिबात नसून, दोनचार राजकीय-दुकानदारांमधले ते गाजलेले व प्रसंगी संबंधित सर्वांच्या राजकीय फायद्यासाठी मुद्दाम गाजवलेले वाद आहेत, इतकंच फक्त!**

थोडक्यात, ''गांधी, पटेल, सुभाष, नेहरु, बाबासाहेब गेले; पण, हे 'दुकानदारसाहेब' मात्र, जायचेच राहून गेले''... आणि, ते तसे कधि जाणारही नाहीत; कारण, 'दुकानदारी' परंपरेने चालणारी गोष्ट आहे! आपलं प्रॉडक्टच कसं चांगलं, दुसऱ्याचं कसं वाईट आणि आपणच कसे आपल्या प्रॉडक्टचे अधिकृत विक्रेते आहोत, आपली कुठेही 'शाखा' नाही... ही अशी, उघडीनागडी नफेखोर व्यापारी भाषा आणि स्पर्धा, इथे चालते. भाबडे, अज्ञानी लोक... याला विचारसरणी वगैरे समजतात.

फुल्यांची 'ब्राह्मणद्वेषी' भासवली गेलेली भाषा, ही उत्तर पेशवाईमधल्या ब्राह्मणशाहीतल्या भयंकर अन्याय-अत्याचाराविरुद्धची स्वाभाविक व नैसर्गिक प्रतिक्रिया होती. मात्र, ''द्वेषाचे निर्मूलन, द्वेषाने होत नसते; हे, त्या 'जाणत्या'ने ओळखले होते. म्हणूनच, ब्राह्मण समाजाने तुमच्यावर अत्याचार केले म्हणून, तुम्ही त्यांच्यावर अत्याचार करा'', असं ते कधीच बोलले नाहीत. उलट जर, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक समानता येणार असेल तर, पिढ्यानपिढ्या झालेले अत्याचारही आम्ही विसरायला तयार आहोत...'' ही आभाळाएवढ्या उंचीची भूमिका घेणारा ज्योतिराव, एक 'महात्मा' होता!

विधवा विवाहबंदी, शिक्षणबंदी, विधवा केशवपन, पादत्राणे वापरावयास बंदी... अशा अनेक गुलामीच्या अमानुष शृंखलांमध्ये तत्कालीन 'स्त्री' अडकलेली होती. 'पुनर्विवाह बंदी'ला सहाय्यभूत होणारी, ब्राह्मण जातीतील विधवा स्त्रियांच्या 'केशवपना'ची ओंगळ, विकृत प्रथा मोडीत काढण्यासाठी ज्योतिबांनी न्हाव्यांचा संप घडवून आणला होता, हे विसरुन चालेल? ज्योतिबांनी विधवा-विवाह चळवळ सुरु केली, ती कोणासाठी?

न्या. महादेव गोविंद रानडे यांची बहीण, विधवा म्हणून परत आली, त्यावर ज्योतिबा आपल्या समाजसुधारक मित्राला, न्या. रानडेंना म्हणाले, ''महादेवराव, ही तर समाजसुधारणेची फार मोठी संधी या कौटुंबिक संकटात चालून आलीय. तुम्ही बहिणीचा पुनर्विवाह करुन द्या.''...

मनातून ज्योतिबांचा सल्ला पटत असूनही तेव्हा, कुटुंबियांकडून होणाऱ्या संभाव्य विरोधामुळे न्या. रानडेंची तशी हिंमत झाली नाही आणि त्यांनी स्वतःच्या बहिणीचा पुनर्विवाह टाळून तिच्यावर एकप्रकारे अन्याय करणंच पसंत केलं. याच, न्या. रानडेंनी स्वतः मात्र आपली पत्नी वारल्यानंतर ३२ व्या वर्षी ११ वर्षीय मुलीशी पुनर्विवाह केला होता. ''कथनी आणि करनी'' यात फरक नसणारा, ज्योतिबा, हा एक दुर्मिळ 'अवलिया'च!

**बाल-तरुणवयात विधवा झालेल्या ब्राह्मण जातीतील स्त्रियांच्या निसर्गसुलभ भावनांचं दमन करणारी 'पुनर्विवाह बंदी' धर्ममार्तंडांकडून लादली गेल्यामुळेच, काही स्त्रियांकडून होणाऱ्या तारुण्यसुलभ चुकांची (त्या, चुका तरी कशा म्हणणार?) परिणती म्हणून होत असलेले गर्भपात, बालहत्या, आत्महत्या टळाव्यात म्हणून, अशा महिलांसाठी महात्मा फुलेंनी १८६३ मध्ये 'बालहत्या प्रतिबंधक गृह' स्थापन केले. तिथे अशा स्त्रिया गुपचूप आपले 'समाजमान्यता' नसलेलं बाळंतपण आटोपून स्वतःच्या व जन्मलेल्या बाळाच्या जीवासह, स्वत:सोबत घराण्याचीही इज्जत वाचवत होत्या, बदनामी टाळत होत्या. आज हे निदान ऐकण्यास तुलनेनं काहीसं सहज जरी वाटत असलं; तरी, दिडशे वर्षांपूर्वीचा महाकर्मठ व दांभिक काळ आठवून कल्पना करा... आजही, अशा काही सामाजिक सेवासुविधा उभारणं, बिलकूल सोपं नाहीच! आपल्याच जातीत जन्मलेल्या स्त्रियांच्या,** ...पृष्ठ क्र. ७ वर

...पृष्ठ क्र. ६ वरुन

**या अडचणी ब्राह्मण समाजातील कुण्या तत्कालीन समाजसुधारकास दिसल्या नाहीत अथवा दिसल्यावरही, त्यावर प्रत्यक्ष कृती करण्याची हिंमत केलेली दिसत नाही.**

महात्मा फुलेंनी जातीपातींनी केलेल्या जातीय अपकृत्यांवर पुराव्यासह प्रासंगिक टीका प्रच्छन्न शब्दांत अत्यंत कठोरपणे जरुर केली... पण, कधीच कोणत्या जातीचा ठरवून द्वेष केला नाही किंवा कोणत्याच जातीच्या विरोधात कार्य केले नाही. कोल्हापुरच्या शिवाजीराव या दत्तकपुत्राच्या गादीसंदर्भातील दिवाण माधवराव बर्वे यांनी दाखल केलेल्या अब्रुनुकसानीच्या दाव्यात, 'मराठा'चे संपादक लो. टिळकांच्या 'जामीना'साठी कोणी 'टिळक समर्थक' उभं रहात नसताना, ज्योतिरावांच्या सांगण्यावरून त्यांचे मित्र रामशेठ उरवणे यांनी टिळकांना जामीन दिला... एवढचं नव्हे; तर, २६ डिसेंबर-१८८२ रोजी मुंबईच्या डोंगरी कारागृहातून ४ महिन्यांच्या कैदेनंतर त्यांची सुटका झाल्यावर, पुणे येथे ज्योतिबांनी टिळक-आगरकरांचा जाहीर सत्कार केला.

विष्णुशास्त्री चिपळूणकर, हे शेवटपर्यंत ज्योतिबांचे अत्यंत कडवे विरोधक. चिपळूणकरांचा संशयास्पद मृत्यू झाल्यानंतर, त्यांच्या अंत्ययात्रेला परवानगी मिळत नव्हती. त्यावेळी ज्योतिरावांच्या सांगण्यावरून डॉ. घोले यांनी चिपळूणकरांच्या मृत्यूबद्दल वैद्यकिय साक्ष दिली होती. तसेच, चिपळूणकरांचे डॉक्टर मित्रसुद्धा मृत्यूचा दाखला देण्यास तयार नसताना फरासखान्यात स्वहस्ताक्षरात चिपळूणकरांच्या मृत्यूचा दाखला देऊन ब्रिटीश सरकारच्या फरासखान्याकडून त्यांच्या अंत्यविधीला परवानगी मिळवून देणारे महात्मा ज्योतिबा फुले, हे ब्राह्मणद्वेषी कसे असू शकतात?

व्यवसायाने फुलांच्या सुगंधाशी बांधल्या गेलेल्या (म्हणूनच, आडनाव 'फुले' पडलेले) या ज्योतिराव-सावित्रीमाई दांम्पत्याला ज्या जातीकडून शेणगोटे खावे लागले होते, त्याच ब्राह्मण जातीतल्या विधवा काशीबाईंच्या मुलाला त्यांनी 'दत्तक' घेतले आणि त्याच्या नावे आपली सगळी चल-अचल संपत्ती करुन त्याला चांगले शिक्षण देऊन डॉक्टर बनवले... पण, हे असं सावित्रीमाई-ज्योतिबांचं महान व्यक्तित्व, लोकांपर्यंत यांना कुणाला पोहोचूच द्यायचं नसेल तर?

**महात्मा फुले म्हणजे, एक सामाजिक परिवर्तनकारी, शिक्षक, नगरपालिका सदस्य, शिक्षण तज्ज्ञ, पहिला शेतकी अभ्यासक, कामगार नेता, संघटक, कवी-लेखक असं विभिन्न पैलू असलेलं व्यक्तित्व! कुठल्या जातीधर्माला वाहिलेलं त्यांचं कार्य नव्हतं; तर, ते समस्त मानवजातीच्या कल्याणासाठी वाहिलेलं होतं.**

'सत्यशोधक चळवळीच्या, सत्यशोधक समाजा'च्या या प्रवर्तकाला 'अज्ञान, अन्याय, असत्या'चा सगळा अंधःकारच पिऊन टाकण्याची महान 'तहान' लागली होती... समता, सत्यावर आधारित न्यायी समाजसत्तेच्या उभारणीसाठी 'पंचप्राण' अर्पण करायला आसुसलेल्या, या महात्म्याची 'प्राणज्योत', अखेर २८ नोव्हेंबर-१८९० रोजी निमाली... पण, त्यानंतर, 'फुले' समजून घ्यायला आणि 'फुले' समजून सांगायलाही आपण कमी पडलो... त्यामुळेच, ''फुले वेचिता बहरु कळियासी आला'', असं न होता, फुल्यांची 'सत्यशोधक चळवळ' बहरण्यात मागे पडली !!!

**जाता जाता, म. फुले झोपताना आपल्या उशीखाली, बिछान्याखाली 'दांडपट्टा' ठेवीत असत... दिडशे वर्षांपुर्वीच्या सनातनी, कट्टर-कर्मठ रुढीवाद्यांविरोधात नुसतेच 'दंड' थोपटून निःशस्त्र उभे नव्हते; तर, शिवछत्रपतींप्रमाणेच अखंड सावध राहून 'दांडपट्टा' उगारुन उभे होते.... हे फारच उच्चदर्जाचं 'शहाणपण' होय!**

***.... राजन राजे***

(अध्यक्ष: धर्मराज्य पक्ष)

संदर्भ: चंद्रकांत झटाले (अकोला), सोमनाथ कन्नर, राजेंद्र फातर्पेकर वगैरे तज्ज्ञ मंडळींचे समाजमाध्यमातील संदेश व त्यांच्याशी झालेल्या सखोल चर्चा तसेच, समग्र फुले साहित्य

# 'निसर्ग' हा धर्म व 'पर्यावरण' ही जात...

दोन वर्षांपूर्वी उत्तराखंड, आता केरळ (वायनाड... जिथे, हवामानखात्याकडून फक्त तयारीला लागण्याच्या, २४ तासात जास्तीतजास्त २०४.४ मि.मी. पावसाच्या नारिंगी रंगाची सावधगिरीची सूचना अथवा 'ऑरेंज लर्ट' दिला गेला होता; पण, प्रत्यक्षात दुपटीहून अधिक म्हणजे ४०९ मि.मी. पाऊस पडला आणि दिडशे लोक मृत्यूमुखी; तर, दोनशेहून अधिक गंभीर जखमी झाले) आणि पुढे 'कोकण की, मुंबई'...???

पश्चिम घाट परिसरातील जैवबहुविधतेचं संरक्षण व जतन करण्याकामी नेमलेल्या (WGEEP) माधव गाडगीळ समिती (२०१०) व कस्तुरीरंगन समितीच्या (२०१२) शिफारशींकडे संबंधित सगळ्याच राज्य-सरकारांनी केलेलं अक्षम्य दुर्लक्ष...या 'वायनाड-आपत्ती'च्या निमित्ताने ऐरणीवर आलंय!

एखाद्या रात्रभरात पडणाऱ्या तुफानी पावसावर लक्ष ठेऊन त्याचं पृथःक्करण करणारी यंत्रणा IMDकडे अद्यापपर्यंत नाही...'जागतिक तापमानवाढी'तून आलेल्या 'जागतिक हवामान-बदला'च्या महासंकटाचा विचार करता, ढगफुटीसारखा अतिरेकी पाऊस कुठेही कधिही पडू शकतो. त्यामुळे, दिल्लीपासून गल्लीपर्यंत हाहाःकार माजू शकतो, यासाठी आपण काय करतो आहोत, काय करणार आहोत... हा लाखमोलाचा प्रश्न आहे!

**आपण आपली जीवनशैली, अर्थव्यवस्था, विकासाचं प्रारुप... यात आमूलाग्र बदल करणार आहोत की, नाही?**

**शहरीकरण व औद्योगिकीकरणातील कॉंक्रिटयुक्त 'कार्बन-केंद्री' विकासाच्या 'विकारा'ला आवर घालणार आहोत किंवा नाही?**

...लक्षात घ्या, मुंबईत पुन्हा पुन्हा २६ जुलै-२००५सारख्या नैसर्गिक आपत्ती येऊ घातल्यात.

त्यात, शेकडो नव्हे; हजारो मरणांचा सडा पडू शकतो. 'अनियंत्रित' कार्बन-ऊत्सर्जन करणाऱ्या 'विकासा'च्या नादाने खुळावून, 'विनाशपुरुष' ('विकासपुरुष' नव्हे) बनलेली आपली राजकारणी, गौतम अदानीसारखी भांडवलदार व प्रशासकिय मंडळी... बुलेट ट्रेन, मेट्रो रेल्वे, गगनचुंबी इमारती, विस्तीर्ण महामार्गांचं जाळं...इत्यादींसाठी, **मुंबई आरे कॉलनी, झारखंडमधील विविध खाणकाम प्रकल्प, छत्तीसगडच्या हसदेव जंगलातील खनिकर्म ते थेट ग्रेट निकोबार दक्षिण टोकापर्यंत... भारतभर लाखो वृक्षांची, भातकापणीसारखी सहजगत्या क्रूर-कापणी एकतर करतायत किंवा ती त्यांच्याकरवी एव्हाना करुन पूर्ण झालीय.**

पण, ज्यांच्यासाठी 'पैसाच परमेश्वर' बनलाय आणि ज्यांना 'सत्तासुंदरी'नं वेडपिसं करुन सोडलंय...अशा वखवखलेल्या वृत्तीच्या वरपांगी 'हिंदुत्ववादी'; पण, खऱ्याअर्थाने, औषधालाही 'धार्मिक' नसलेल्यांना, ते काय आणि कसं आकळणार?

...सध्याचा आधुनिक 'भांडवली-समाज', हा आतून कायम अशांत-अस्वस्थ आहे! आतून अशांत-अस्वस्थ असलेला माणूस, कधिही 'धार्मिक' असू शकत नाही. ती अशांति, ती अस्वस्थताच जर केवळ माणसाला...आपापल्या धर्मस्थळांकडे किंवा लाखो निर्बुद्धांचे कळप बाळगणाऱ्या तथाकथित 'धर्मसंप्रदायां'कडे खेचून नेत असेल; तर, मग आपली धर्मस्थळं-प्रार्थनास्थळं व ते धर्मसंप्रदाय तरी, किती प्रमाणात खरे 'धार्मिक' असू शकतील? विविध धर्म, विविध धर्म-संप्रदाय व त्यांचं माजलेलं 'अवडंबर', हे फक्त आता राजकीय, व्यावसायिक व धंदेवाईक अड्डे झालेत!

धर्म, म्हणजे खरंतरं मुळातून 'संप्रदाय'च... संप्रदाय, म्हणजे 'धार्मिक-मार्गा'वरचे टप्पे किंवा नदीतिरावरील विखुरलेले घाट... याचाच अर्थ, 'धार्मिकता', या अंतिम गंतव्य स्थानकावर पोहोचणं सुलभ होण्याची केलेली सोय...हे गंतव्य स्थान कुठलं; तर, आपल्याला 'आत्मसाक्षात्कार' घडणं, स्वतःची ओळख पटणं व खऱ्याअर्थाने सत्यान्वेषी व न्यायाचा आग्रह धरणारी 'धार्मिकता' अंतरंगाच्या रंध्रारंध्रातून खेळणं...

अवघी चराचर सृष्टी, हीच परमात्म्याचंच प्रकट रुप आहे, आपण 'निसर्गप्रेमी' नसून निसर्गाचंच एक अपत्य, त्याचंच अविभाज्य अंग व त्याचाच आविष्कार आहोत...असं मानण्यातून, जी आंतरिक शांति लाभते, तनमनाला वेढणारी स्वस्थता लाभते; तिचं खरीखुरी 'धार्मिकता' होय. **कुठलाही धर्म, महत्त्वाचा नसून 'धार्मिकता' महत्त्वाची आहे; 'देव' महत्त्वाचा नसून 'देवत्व' महत्त्वाचं आहे! पुर्णातून पूर्ण वजा जाता पूर्ण शिल्लक रहाणं, ही हिंदूधर्मातील संकल्पना काय किंवा शुन्यातून शून्य वजा जाता शून्य शिल्लक रहाणं; ही बौद्ध धर्मातील संकल्पना काय...दोन्हीचा निर्देश, धर्मापेक्षा 'धार्मिकता' आणि देवापेक्षा 'देवत्व' मोठं मानण्याकडेच आहे! मग, एखाद्या सानेगुरुजींनी सांगितल्यासारखा जगाला प्रेम अर्पावे, हाच आपसूक धर्म बनत जातो... सानेगुरुजींच्या 'आत्महत्ये'सारखी दुर्दैवी व करुणाजनक घटना आणि फ्रेडरिक नित्शेनं प्रतिपादिलेलं 'देव मरुन गेलाय' किंवा श्रीराम लागू म्हणाले तसं, परमेश्वराला रिटायर (निवृत्त) करा, ही प्रतिपादनं, एकाच अर्थाच्या विविध कृष्णधवल छटा बनून जातात!**

निसर्गाहून स्वतःला श्रेष्ठ समजण्यातून येणारे... कार्बन, रासायनिक, आण्विक 'प्रदूषणकारी' महाकाय-प्रकल्प म्हणजे, विकासाच्या गोंडस नावाखाली, रौद्रभीषण भविष्याची नांदी असलेलं, निसर्गाशी मांडलेलं 'द्यूत'च...जे 'भांडवली-व्यवस्थे'चं अटळ-अनिवार्य असं अपत्य आहे... ज्याला हे उमगलं, त्याच्यासाठी 'निसर्ग' हा धर्म व 'पर्यावरण' ही जात बनून जाते...दुसरं-तिसरं काहीही शिल्लक रहात नाही, धन्यवाद! ***...राजन राजे***

# गुरुपौर्णिमा

भारतातील पहिलावहिला पर्यावरणस्नेही हरित–पक्ष अशी सर्वमान्य ओळख असलेला 'धर्मराज्य पक्ष' आणि कष्टकऱ्यांची लढाऊ संघटना असलेल्या 'धर्मराज्य कामगार–कर्मचारी महासंघा'चे संस्थापक/अध्यक्ष मा. राजन राजे यांना गुरुपौर्णिमेनिमित्त शुभेच्छा देण्यासाठी व त्यांचे आशीर्वाद घेण्यासाठी, पक्षाच्या ठाणे कार्यालयात रविवार, दि. २१ जुलै–२०२४ रोजी 'धर्मराज्य पक्षा'चे कार्यकर्ते, पदाधिकारी, कामगार सदस्य आणि हितचिंतकांनी एकच गर्दी केली होती. मुसळधार पाऊस कोसळत असतानाही, ''राजन राजे'' या पंचाक्षरी मंत्रावर श्रध्दा असणाऱ्या निष्ठवंतांचा ओघ मात्र, आपल्या गुरुला शुभेच्छा देण्यासाठी दिवसभर सुरुच होता. कार्यकर्ते, पदाधिकारी आणि कामगार सदस्यांच्या या प्रेमाने, 'कामगारहृदयसम्राट' अशी ओळख असणाऱ्या मा. राजन राजे यांचे हृदयदेखील भारावून गेले होते. गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा देण्यासाठी येणाऱ्या प्रत्येकाची, त्याच्या कुटुंबीयांची आपुलकीने विचारपूस करुन, भरभरुन आशीर्वाद देत, मा. राजन राजे यांनी, प्रस्थापित राजकीय व्यवस्था आणि धनदांडग्या–भांडवलदारी प्रवृत्तीविरोधात लढण्यासाठी, सर्वांनी एकत्र येऊन संघर्षरत झाल्याशिवाय पर्याय नसल्याचे सूतोवाच यानिमित्ताने केले. कामगार आणि शेतकरी हे भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा तर आहेतच; परंतु, त्याचबरोबर हे दोन्ही घटक म्हणजे, देशाची सामाजिक व सांस्कृतिक ओळख असल्याची जाणीव मा. राजन राजे यांनी, आपल्या निष्ठावान कार्यकर्ते, पदाधिकारी आणि कामगार सदस्यांना यावेळी करुन दिली.

















**(सन्माननीय शिवसेना पक्षप्रमुख, सर्वश्री उद्धवजी ठाकरे यांना, त्यांच्या ६४व्या वाढदिवसानिमित्त अभीष्टचिंतन करणारा व शुभेच्छा देणारा ‘धर्मराज्य-संदेश’....)**

**मा. उद्धवजी,**

६४व्या वाढदिवसानिमित्त, आपले आमच्या ‘धर्मराज्य-परिवारा’तर्फे; तसेच, तमाम महाराष्ट्रीय-भारतीय जनतेतर्फे अभीष्टचिंतन व आपल्याला शतकोत्तर निरोगी आयुष्य लाभण्यासाठी मनःपूत शुभेच्छा!

आपल्या वयाची ‘चौसष्टी’ पूर्ण करत, आपण आज वयाच्या ‘चांगदेव-पासष्टी’त प्रवेश करत आहात....

‘‘सुवर्णाचे दागिने घडवले, म्हणून त्याच्या सोनेपणात उणीव निर्माण होत नाही किंवा मातीची भांडी घडवली म्हणून मातीच्या गुणधर्माचा क्षय होत नाही वा चंद्रावर सोळा कलांचे आवरण घातले गेले, म्हणून चंद्राचा लोप होत नाही...तद्वतच, स्वतः परमात्मा विविध आकारांनी, रुपांनी नटला; तरीही, त्याच्या मूळ ‘परमात्मा स्वरुपा’त काहीही उणेपणा येत नाही...परमात्माच ‘द्रष्टा, दृश्य आणि दर्शन’ या त्रिपुटींच्या रुपाने व्यवहार करतो आणि ‘अविद्या’कारणे, एकाच परमात्म्याची द्रष्टादर्शनादि तीन रूपे आपल्याला दिसतात; मात्र, विचारजागृतीने त्या तिघांचाही नाश होतो व ‘मीपण माझे पक्व फळापरी गळले हो’, अशा आत्मसाक्षात्कारातून एक ‘आत्मतत्त्व’च काय ते शिल्लक उरते’’, असा चांगदेवाला रोकडा उपदेश करणाऱ्या, ज्ञानदेवांचं स्मरणही आपल्या वाढदिवसाच्या ‘पासष्टी’निमित्ताने आज झाल्यावाचून रहात नाही.

...असाच रोखठोक उपदेश, समस्त महाराष्ट्राला करत तत्कालिन व्यवस्थेला प्रचंड हादरा देण्याचं क्रांतिकार्य करणाऱ्या, आपल्या आजोबांच्या म्हणजेच स्व. प्रबोधनकार ठाकरेंच्या पावलावर पाऊल ठेवत, वर्तमानकाळात आपण ‘राजकीय आसुरी-शक्तिं’पुढे दंड थोपटून खंबीरपणे उभे ठाकलेले आहात!



तेव्हा, या निर्णायक स्वरुपाच्या राजकीय-संघर्षकाळात आपल्याला भव्यदिव्य राजकीय-यश मिळण्यासोबतच, प्रबोधनकारांकरवी तेव्हा घडली तशी, मोठी वैचारिक-घुसळणदेखील महाराष्ट्रभरात घडो व त्यातून, सर्वसामान्य मराठी-जनतेच्या सर्वंकष हिताचं ‘नवनीत’, या ‘महाराष्ट्र-देशा’च्या हाती लागो...हीच, आजच्या दिवशी (२७ जुलै-२०२४) परमात्म्याचरणी प्रार्थना...धन्यवाद!

**...राजन राजे**


# ठाणे शहरातील खड्डे त्वरित बुजविण्यात यावेत !

## ‘धर्मराज्य पक्षा’ची महापालिका आयुक्तांकडे मागणी

**ठाणे (प्रतिनिधी) : यंदाच्या पावसाळ्यात ठाणे शहरातील रस्त्यांवरील खड्ड्यांचे प्रमाण मोठ्याप्रमाणात वाढले असून, परिणामी वाहतूककोंडीचा त्रास ठाणेकर नागरिकांना सहन करावा लागत आहे. गेल्या काही दिवसांपासून ठाणे शहरात पावसाने चांगलाच जोर धरलेला आहे. त्यामुळे आधीच निकृष्ट दर्जाचे काम केलेल्या रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले असून, रस्त्यात खड्डे की, खड्ड्यांत रस्ते असा प्रश्न आता, सर्वसामान्य करदात्या-कष्टकरी ठाणेकरांना पडलेला आहे. शहरातील बहुतांश रस्त्यावर मोठमोठाले खड्डे पडलेले असल्याने, वाहनांच्या रांगा लागून, एक किलोमीटरच्या अंतरासाठी, तब्बल अर्धा तास लागत असल्याचे विदारक चित्र ठाण्यात निर्माण झालेले आहे. या परिस्थितीमुळे सर्वसामान्य नागरिक आणि वाहनचालकांमध्ये संताप पसरलेला दिसून येत आहे.** ठाणे शहर हे, मुंबईचे धाकटे भावंड म्हणून ओळखले जाते. गेल्या काही वर्षांत ठाणे प्रचंड फोफावल्याने, नागरिकीकरण मोठ्याप्रमाणात वाढले. याचा परिणाम शहरातील सोयी-सुविधांसह, रस्ते वाहतुकीवरदेखील पडला आहे. लोकसंख्यावाढीचा परिणाम साहजिकच वाहनाच्या संख्येवर झाल्याने, संपूर्ण शहरच यामुळे वेठीस धरले गेलेले आहे. दरम्यान, सकाळी कामावर जाणारा चाकरमानी आणि शाळेत जाणारे विद्यार्थी यांना, या वाहतूककोंडीचा सर्वात जास्त त्रास सोसावा लागत आहे. याच अनुषंगाने ‘धर्मराज्य पक्षा’च्या वतीने ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त सौरव राव यांना पत्र लिहिण्यात आले असून, ठाणे शहरातील खड्डे त्वरित बुजविण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. पक्षाचे सहसचिव नरेंद्र पंडित यांनी,



आयुक्तांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की, डांबरी रस्ते अवघ्या काही दिवसांत उखडले जातात. मुळात, कंत्राटदारच निकृष्ट दर्जाचे बांधकाम साहित्य वापरुन, जाणूनबुजून कच्चे रस्ते तयार करतात, जेणेकरुन संबंधित रस्त्यावर खड्डे पडले की, त्याच रस्त्याचे पुन्हा काम मिळवून, त्यातून जादा मलिदा खाण्यास मिळतो. अर्थात, यामागे स्थानिक लोकप्रतिनिधी आणि महापालिकेतील संबंधित अधिकारी यांचा आशीर्वाद असतो, हे सर्वज्ञात आहे. **एकाच रस्त्याची पाच-पाचवेळा कामे काढून, कंत्राटदार आणि स्थानिक लोकप्रतिनिधी आपली पंचवार्षिक आर्थिक योजना यशस्वी करीत असतात. दुर्दैवाने, याच भ्रष्टाचारी प्रवृत्तीमुळे ठाणे महानगरपालिकेच्या तिजोरीत घट निर्माण झाली असून, याकडे नरेंद्र पंडित यांनी, आपल्या पत्राद्वारे आयुक्तांचे लक्ष वेधले आहे. दरम्यान, करदात्या-कष्टकरी ठाणेकर नागरिकांच्या घामाच्या पैशावर मारला जाणारा हा डल्ला असून, अशाप्रकारची लूट आपण थांबविण्याची आग्रही मागणी करतानाच, अशाप्रकारच्या वाहतूककोंडीमुळे एखाद्या अत्यवस्थ रुग्णाला, रुग्णालयात घेऊन जाणारी रुग्णवाहिका भररस्त्यात अडकून पडली तर, रुग्णाच्या जीवितास धोका होण्याची भीती पत्रातून व्यक्त करण्यात आली आहे.** ठाणे शहरातील कळवा नाका, जांभळी नाका, टेंभी नाका, कापुरबावडी, राम-मारुती रस्ता, ठाणे पूर्वेकडील स्टेशन परिसर याठिकाणी प्रचंड रहदारी असते आणि याला ठाणे शहरात पडलेले खड्डे कारणीभूत आहेत. तरी, ही परिस्थिती टाळण्यासाठी, दर्जेदार बांधकाम साहित्य वापरुन, शहरातील खड्डे त्वरित बुजवून टाकावेत व ठाणेकर नागरिकांची तसेच, वाहनचालकांची वाहतूककोंडीतून कायमस्वरुपी सुटका करावी, अशी आग्रही मागणी ‘धर्मराज्य पक्षा’चे सहसचिव नरेंद्र पंडित यांनी, आपल्या पत्राद्वारे आयुक्तांना शेवटी केली आहे.



# 'गांधी व्देष आजही का उरतो ?

आजच्या लोकसत्तेत 'प्रमोद मुनघाटे' यांनी चंद्रकांत वानखेडे यांच्या 'गांधी का मरत नाही?' या पुस्तकाचा इंग्रजी अनुवाद करणाऱ्या पारोमिता गोस्वामी लिखित 'व्हाय गांधी इज इम्मॉर्टल' या पुस्तकाचे परीक्षण करताना 'गांधी द्वेष आजही का उरतो?' याविषयी एक चांगले टिपण केलेले आहे, त्यातील हा महत्वाचा संकलित अंश... JK

**गांधींची हत्या नथुराम गोडसेच्या पिस्तुलाच्या गोळीने झाली, हे प्रत्यक्ष वास्तव आहे. पण या घटनेमागील अप्रत्यक्ष वास्तव मात्र वेगळे आहे. गांधी फाळणीला जबाबदार होते किंवा ते मुस्लीमधार्जिणे होते म्हणून त्यांची हत्या झाली, हे कारण लेखकाला पुरेसे वाटत नाही. 'गोडसे' हे भारतातील जातिव्यवस्थेच्या साखळीतील एक प्रतीक आहे. त्यामागे गांधींना विरोध करणाऱ्या व्यापक व हिंदुत्ववादी गटाचा सामूहिक गांधीद्रेष आणि गांधींच्या हत्येचे मूळ हे सांस्कृतिक व विशेषत: जातीय वर्चस्ववादाच्या संघर्षात आहे. म्हणजे गांधीहत्येच्या कटाचे स्वरूप केवळ सांस्कृतिक व धार्मिकच नव्हते तर, ते जातीय होते.**

**गांधीपूर्व भारत कसा होता, ते पुण्यातील एका विद्वानाचे हे विधान वाचल्यावर लक्षात येते. 'ज्या अर्थी चित्तपावन ब्राह्मणांच्या हातून ब्रिटिशांनी सत्ता मिळविली असेल, तर तर ती सत्ता चित्तपावन ब्राह्मणांनीच परत मिळविली पाहिजे वा भोगली पाहिजे'. 'शेतकऱ्यांनी विधिमंडळात जाऊन काय नांगर धरावयाचा आहे?' असा प्रश्न लोकमान्य टिळकांनीही विचारला होता. ''एकूणच स्वातंत्र्य कोणासाठी? वर्चस्व कोणाचे? तर जन्मजात आधारावर ज्यांना 'जन्मजात' श्रेष्ठत्व मिळाले आहे त्यांचे, वा 'अभिजनांचे'. मग बहुजनांचे काय? 'शेवटच्या' माणसाचे काय? याची चर्चादेखील स्वातंत्र्याच्या चळवळीत गांधीपूर्व काळात नव्हती.**

गांधींच्या पूर्वीचे राजकारण मुंबई, कलकत्ता व मद्राससारख्या महानगरात एकवटलेले असताना, गांधी चंपारणसारख्या मागास भागापासून, आपल्या आंदोलनाची सुरुवात करून अभिजनवादाला धक्का देतात. गांधींच्या प्रभावामुळेच १९१६च्या लखनौ अधिवेशनात प्रथमच शेतकऱ्यांच्या तोंडून त्यांचे दु:ख येते, अशी ते मांडणी करतात. थोडक्यात भारतीय स्वातंत्र्याच्या राजकारणातील गांधीच्या अशा हस्तक्षेपामुळे तेव्हापासूनच गांधी काही समूहांच्या डोळ्यात काट्यासारखे सलत राहिले असल्यास नवल नाही. टिळक अस्पृश्यता निवारण परिषदेच्या जाहीरनाम्यावर सही करीत नाहीत; तर, दुसरीकडे गांधी आपल्या आश्रमात आपल्या अनुयायांच्या विरोधाची पर्वा न करता अस्पृश्य जोडप्याला प्रवेश देतात. स्वातंत्र्य हे शेवटच्या माणसासाठी आहे, ही भूमिका गांधी घेतात आणि स्वातंत्र्य आंदोलनात सर्व जातीधर्मांचा, स्त्री-पुरुषांचा आणि सामान्य कष्टकरी-शेतकऱ्यांचा सहभाग ते मिळवतात. यामुळे टिळकांच्या प्रभावळीतील बुद्धिवंतांच्या भूमिकेला तडा जातो.

**गोडसेच्या गोळ्यांनी गांधींची हत्या झाली असली तरी, आजही भारतात गांधीहत्येच्या कटातील सांस्कृतिक व धार्मिक सूत्रे जिवंत आहेत. देहाने संपवून गांधी संपविताच आला नाही, ही विरोधकांची समस्या आहे. गांधींच्या 'अहिंसा' आणि 'सत्याग्रह' या संकल्पना जीवनाच्या सम्यकतेचे स्वरूप आहे. म्हणून गांधी जीवनाचे राजकीय, सामाजिक किंवा आध्यात्मिक अशी विभागणी करीत नाहीत. म्हणूनच गांधी आजही संपूर्ण जगात अधिकाधिक औचित्यपूर्ण ठरत आहे. गांधीहत्येवर गांधी विचारांनी मिळवलेला हा विजय आहे. पण, आपल्या जात-धर्म विशिष्ट राष्ट्रवादाच्या आड येतात म्हणून, आजही भारतात गांधींच्या बदनामीची मोहीम विरोधक सुरू ठेवतात.**

महाराष्ट्राच्या विचारविश्वात 'गांधी आणि आंबेडकर' हे एक ध्रुवीकरण सातत्याने दिसते. गांधींचे स्वत:ला सनातनी हिंदू म्हणवणे, सुरवातीला चातुर्वर्ण्यावर विश्वास असल्याचे सांगणे आणि दलितांच्या विभक्त मतदारसंघाला विरोध असणे, यावरून गांधी आणि आंबेडकर यांच्यात जाणीवपूर्वक विरोध निर्माण केला गेला. गांधींचे आंबेडकर यांना समजून घेणे आणि त्याची आंबेडकरांना जाणीव असणे हे अनेक प्रसंगातून अधोरेखित होते. गांधींच्या धर्म आणि अध्यात्माची अडचण पुरोगामी, डाव्या चळवळीतल्यांना जशी होत असते, त्यापेक्षाही ती हिंदुत्ववाद्यांना अधिक होत राहते. गांधी स्वत:ला सनातनी हिंदू मानत असले; तरी, हिंदुत्वाच्या कोणत्याही खुणा बाळगायला नकार दिला. त्यांच्या आयुष्यात 'राम' दिसतो; पण, रामाचे मंदिर, रामाची मूर्ती, पूजा-अर्चा किंवा रामाचा साधा फोटोही दिसत नाही. गांधी वेदप्रामाण्य मानत नाही आणि शंकराचार्यांनी केलेल्या हिंदू धर्माच्या व्याख्येलाही नाकारतात. विवेकाला आणि बुद्धीला जे पटणार नाही, अशा गोष्टी ते स्वत:वर बंधनकारक मानत नाही; आणि देशातील प्रत्येकाला आपण पोटभर अन्न व अंगभर वस्त्र देऊ शकत नाही, तोपर्यंत त्यांच्या दृष्टीने धर्माला काही अर्थ उरत नाही, अशी भूमिका घेतात.

**प्रा. नलिनी पंडित यांनी 'जातिवाद आणि वर्गवाद' या त्यांच्या पुस्तकात लोकमान्य टिळकांच्या संबंधात असे म्हटले आहे, ''मात्र, टिळकांसारख्या लोकोत्तर नेत्यालाही मध्यमवर्गीय राजकारणाच्या मर्यादा शेवटपर्यंत ओलांडता आल्या नाहीत. शहरातील सुशिक्षित लोकच त्या काळी राजकीय चळवळीत. अग्रभागी होते.'' या लोकांच्या हितसंबंधाच्या राजकारणाला गांधींच्या राजकारणामुळे खीळ बसली होती. ''तात्कालिक राजकीय प्रश्नांना अवास्तव महत्त्व देऊन, जहाल राष्ट्रवादी पक्षानेही या उच्चवर्गीय मध्यमवर्गाचाच अनुनय केला आणि बहुजन समाजाच्या भावनांची व हितसंबंधांची उपेक्षा केली. सत्यशोधकांच्या समानतेच्या मागणीला विरोध करून त्यांनी ब्राह्मणेतरांची मने दुखावली.** अस्पृश्यता नष्ट करण्याच्या जाहीरनाम्यावर सही करण्याचे नाकारून दलित पुढाऱ्यांची नाराजी त्यांनी (लोकमान्य टिळकांनी) ओढवून घेतली. कूळ कायद्याच्या बाबतीत खोत, सावकारांची बाजू घेऊन शेतकऱ्यांची सहानुभूती ते गमावून बसले. म्हणून टिळकांचे कणखर व्यक्तिमत्त्व, उत्कट देशभक्ती, निर्भय व नि:स्पृह वृत्ती आणि अतुलनीय स्वार्थत्याग यामुळे सर्वांनाच जरी त्यांच्याबद्दल निस्सीम आदर व स्वाभिमान वाटला तरी, महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर जनता त्यांच्या चळवळीत हिरिरीने सामील झाली नाही.''

# ‘खाउजा’ धोरण ते ‘जागतिक-सपाटीकरण’



फ्रान्समध्ये नुकत्याच, ज्या तेथील ‘नॅशनल-सेब्ली’च्या मुदतपूर्व निवडणुका पार पडल्या व त्यात, डाव्या विचारसरणीच्या पक्षांच्या आघाडीला मोठा ऐतिहासिक विजय मिळाला; त्यावर, मी सर्वसाधारणपणे महाराष्ट्रातल्या ग्लानीत वा निद्रिस्त अवस्थेत असलेल्या, झोपी गेलेल्या कामगार-कर्मचारीवर्गाला गदगदा हलवून जागं करण्यासाठी, सदरहू संदेश प्रसारित करताच...अनेक तथाकथित बुद्धिजिवी मंडळींचा (जी आपल्या निहीत स्वार्थापोटी, भांडवली-व्यवस्थेच्या पालखीचे भोई किंवा पाईक म्हणून काम करत असतात) आणि भांडवली-व्यवस्थेचे ‘दलाल’ म्हणून काम करणाऱ्या कॉर्पोरेटीय बड्या अधिकारीवर्गाचा व बड्या प्रशासकीयवर्गाचा एकच पोटशूळ उठला व ते माझ्या संदेशावर सडकून टीका करु लागले (त्यातूनच, ‘किमान-वेतना’सह एकूणच तुटपुंज्या भारतीय ‘पगारमाना’चा विषय ऐरणीवर आला व मुळातून, तसं व्हावं, ही मनोमन असलेली इच्छा आपसूकच फलद्रूप झाली).

...टीकेचा सूर, स्वाभाविकच **‘‘फ्रान्समधला जीवनस्तर (जो सर्वसाधारणपणे इंग्लंडप्रमाणेच असतो) अथवा रहाणीमान व आपलं भारतीय रहाणीमान’’...यातल्या, ‘कथित फरका’वर बेतलेला होता (अनेकांकडून त्याबाबत, संबंधित वाचकांच्या डोळ्यात ‘धूळफेक’ करण्याचा अश्लाघ्य प्रयत्नही करण्यात आला)...त्याला संबोधूनच, जाहीरपणे पुढील प्रतिपादन करतो आहोत, जेणेकरुन ‘भारतीय-पगारमाना’बाबतची खरी दारुण परिस्थिती, आहे त्या स्वरुपात, जनतेच्या निदर्शनास यावी व कामगार-कर्मचारीवर्गाच्या डोळ्यात झणझणीत अंजन पडावं आणि त्यांची एकदाची ‘झोपमोड’ व्हावी, ही सदिच्छा!**

सोबत जोडलेल्या अर्थशास्त्रीय-सारणी (Tables) नीट अभ्यासल्या...तर, आपण किमान एवढ्या निष्कर्षावर पोहोचतो की, ज्याला ‘Purchasing Power Parity’ (विशिष्ट चलनसापेक्ष ‘क्रयशक्ति’ची समसमान पातळी) म्हणतो...ती भारत-फ्रान्सच्या (अर्थातच, इंग्लंडच्याही) संदर्भात किमान ‘तिप्पटी’ एवढी भरते. म्हणजेच, तिथलं वेतनमान भारतीय चलनात रुपांतरीत करुन घेतल्यावर, त्याच्या किमान ‘एक तृतीयांश’ एवढं तरी वेतनमान भारतात असलंच पाहिजे...म्हणजेच, फ्रान्सचं ‘किमान-वेतन’, फ्रान्समध्ये भारतीय चलनात दीड लाख रुपये असेल; तर, भारतात ते ‘किमान-वेतन’ रु. ५०,०००/- (रु. पन्नास हजार) दरमहा तरी, असणं गरजेचं आहेच आणि तिथलं राष्ट्रीय सरासरी वेतन (National Avg. Wage) जर समजा (ते त्याहीपेक्षा जास्त असणार), ५ हजार ‘युरो’ इतकं म्हणजे, भारतीय चलनात रु. ४ लाख ५६ हजार असेल; तर, आपलं राष्ट्रीय सरासरी-वेतन रु. १ लाख ५२ हजार असायलाच हवं!

**बरं, ‘भांडवली-व्यवस्था’ कशी काम करते, ते ही या निमित्ताने बघूया...१९९१च्या ‘खाउजा’ (खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण) धोरणानंतर जगभरातील पाश्चात्य देशांतदेखील या व्यवस्थेने, भांडवलाच्या पलायनाने अथवा एका देशातून दुसऱ्या देशात उड्डाण करण्याच्या कृतितून व तशा धमकावणीतून** (Flight of the Capital), **तेथील वेतनमान कमालीचं घटवलेलं आहे, ज्याला वेतनाचं ‘जागतिक-सपाटीकरण’** (Flattening of the Wages Worldwide) **असं म्हणतात... हे सर्व घडल्यानंतरची, ही वर मांडलेली परिस्थिती आहे (मग, त्याअगोदर काय आणि कशी स्थिती असेल, फक्त कल्पना करा).**

कुठलाही ‘भांडवलदार’ (कंपनीचा मालक अथवा व्यवस्थापन) हा वरकरणी किंवा तांत्रिकदृष्ट्या, कंपनीच्या आत, आपल्या कामगार-कर्मचारीवर्गाशी एकेकटा वाटाघाटी करताना दिसत असला...तरीही, तो ‘भांडवली-व्यवस्थे’चा वा ‘भांडवली-शृंखले’चा एक अविभाज्य भागच असतो... म्हणूनच, महाकाय ‘भांडवली-वटवृक्षा’चा, त्याला आतून मोठा आधार असतो! त्यामुळेच, वाटाघाटीच्या टेबलावर बसल्यावर ते कामगारांवर कुरघोडी करण्यात चांगलेच समर्थ ठरतात.

कंपन्यांच्या जमीन-खरेदीविक्रीच्या व्यवहारांपासून ते अन्य सामाजिक क्षेत्रांतून (शिक्षण, आरोग्य, वहातूक, पाणीपुरवठा इ.) सरकारने खाजगीकरण व उदारीकरणाच्या गोंडस नावाखाली काढून घेतलेले अंग व खाजगीक्षेत्राला त्यातून मिळालेले मोकळे रान आणि वाढती महागाई; तसेच, बेरोजगार शहरी-कामगारांचा अनियंत्रित वाढता पुरवठा (Reserve Army of Unemployed उदा. आपल्याकडील उत्तर भारतीय कामगारांचे लोंढे)...यामुळे, व्यक्तिगतरित्या वा संघटितपणे आपल्या न्याय्य-हक्कांसाठी लढण्यावरदेखील संक्रांत येते व कामगार सर्रास लढ्यातून कच खाताना दिसतो.

हे सगळे उपरोल्लेखित निर्णय, एकटा कुठलाही ‘भांडवलदार’ घेत नसतो; तर, संपूर्ण ‘भांडवली-व्यवस्था’ एकत्रितरित्या आपापसात ‘गुन्हेगारी-संधान’ बांधून घेत असते.

थोडक्यात सांगायचं तर, जवळपास शतकभराहून अधिककाळच्या ‘कल्याणकारी-राज्य’ संकल्पनेची (Welfare-State) अतिशय अनुकरणीय अशी समृद्ध परंपरा, फ्रान्सच्या राजनैतिक-अर्थव्यवस्थेकडून आपण घेण्यासारखी आहे. अगदी गेल्या नवउदारमतवादाच्या (Neo-Liberalism) चार दशकांतदेखील राष्ट्रीय ठोकळ उत्पन्नाशी (GDP) किंवा अर्थसंकल्पीय-तरतुदींशी तुलना करता, सर्व युरोपियन राष्ट्रांमध्ये ‘कल्याणकारी-राज्य योजनां’वर फ्रान्स सगळ्यात जास्त खर्च करत आलेला आहे!

यासाठी, सरकारच्या हाती पुरेसा निधी असावा लागतो...यासंदर्भातदेखील, कर-महसूल आणि राष्ट्रीय ठोकळ उत्पन्नाशी फ्रान्सचं असलेलं गुणोत्तर (Tax-GDP Ratio) इतर प्रगत राष्ट्रांपेक्षा सर्वात जास्त आहे.

**भारतात सामाजिक सुरक्षा योजनांची** (Social Security Measures) **मोठी वानवा आहे. आपल्या मुलांना जेवढा, ही बडी मंडळी खर्चासाठी ‘पॉकेटमनी’ देतात किंवा घरच्या कुत्रा सांभाळण्यासाठी धनिक लोकं जेवढा खर्च करतात...त्यापेक्षाही, कमी पगार आपल्या कामगारांना देतात (नुकतीच, २१ जून रोजी स्विस फौजदारी न्यायालयाने अब्जाधीश हिंदुजा कुटुंबातील चार सदस्यांना, त्यांच्या जिनिव्हा व्हिलामधील नोकरांचे शोषण केल्याच्या आरोपावरुन तुरुंगवासाची शिक्षा सुनावल्याची बातमी, जरा विचारात घ्या) कंपन्यांमधील ‘भंगार-विक्री’तून जेवढा पैसा मिळतो, त्यापेक्षाही अनेकदा कामगारांच्या एकूण पगाराचा खर्च** (Wage-Bill) **कमी भरत असतो.**

(कंपनी-व्यवस्थापन व कामगार-कर्मचारीवर्गाच्या, कंपनीच्या गेटच्या आतील, आपापसातील संबंधांवर, कंपनी-गेट बाहेरील राजकीय-परिस्थिती मोठा प्रभाव टाकत असते; हे, फ्रान्समधल्या ज्वलंत उदाहरणावरुन संबंधितांच्या सहजी ध्यानात यायलाच हवं...फ्रान्समधील मजबूत आर्थिकस्थिती व तेथील कल्याणकारी-राज्य योजनांमुळेच, तेथील कुठल्याही क्षेत्रातील कामगार-लढ्याला मोठं बळ मिळत असतं! वरील विवेचनावरुन, सुस्पष्टरित्या आपल्या ध्यानात येईल की, समस्त कामगार-कर्मचारीवर्गाने, म्हणूनच आपापल्या देशात घडणाऱ्या राजनैतिक-अर्थव्यवस्थेकडे काळजीपूर्वक लक्ष दिलंच पाहिजे आणि तिच्या जडणघडणीत व स्थित्यंतरात...मतदानाचा लोकशाही-हक्क बजावताना व मतदानपश्चात विविध सामाजिक-राजकीय प्रश्नांवरील सार्वत्रिक-आंदोलनांमध्ये (उदा. महागाई, भ्रष्टाचार व

लोकसंख्या नियंत्रण, परप्रांतीय आक्रमण रोखणे, संपत्तीचं न्याय्य फेरवाटप वगैरे), सहभागी होत स्वतःच्या हिताचा ठसा उमटवलाच पाहिजे!)

**''किमान-वेतन रु. ४०,०००/- (रु. चाळीस हजार) प्रति मास... न देणाऱ्यास तुरुंगवास'', ही 'धर्मराज्य पक्षा'ची घोषणा, महाराष्ट्राच्या शहरं-उपनगरांतून गल्लोगल्लीच नव्हे; तर, ग्रामीण भागातही घुमली पाहिजे!**

**पाश्चात्य देशात जसा, कॉर्पोरेटीय क्षेत्रात 'किमान (कमीतकमी) पगार व कमाल (जास्तीतजास्त) पगार' यातील गुणोत्तर जास्तीतजास्त १ : १२ असण्याचा जोरदार आग्रह धरला जातो ...तसाच, तो कडवा आग्रह, इथल्या कामगारांनीही धरलाच पाहिजे.**

...लक्षात घ्या, राष्ट्रीय-संपत्तीचे खरेखुरे 'निर्माते' (Wealth-Creators) असलेल्या भारतातल्या कामगारांना आणि शेतकऱ्यांना लुटूनच, त्यांचं अतोनात शोषण करुनच... ही रक्तपिपासू-निर्मम-शोषक व्यवस्था (Vampire-State System) चालते; सध्याच्या काळात, देशाची बहुतांश संपत्ती, कंपन्या-कारखान्यांमधूनच निर्माण होत असते; म्हणूनच, उद्योग-सेवा क्षेत्रात 'कंत्राटी-कामगार पद्धत' नावाची 'गुलामगिरी व नव-अस्पृश्यता' लादली गेलीय...हे ही, या निमित्ताने समजून घ्या आणि तिचं समूळ उच्चाटन करणं, हेच आजच्या घडीला आपल्यापुढचं सर्वात मोठं राजकीय-आव्हान आहे व त्यादृष्टीनेच, मनाची मजबूत बांधणी करा!

***..राजन राजे***

तळटीप : Healthcare Coverage (Securityµ Soc ial): French citizens are entitled to healthcare coverage under the national health insurance system, which reimburses a portion of medical expenses.

Family Allowances (Allocations Families): Financial support is provided to families with children to help cover expenses related to raising children.

Unemployment Benefits (Assurance Ch3mage): Financial assistance is available to individuals who have lost their jobs involuntarily, provided they meet certain eligibility criteria.

Pensions (Retraite): Upon reaching retirement age, French citizens are eligible for a state pension, which is based on their contributions throughout their working life.

Disability Benefits (Prostrations pour Handicaps): Financial assistance and support services are available for individuals with disabilities.

Housing Benefits (Aide au Lodgement): Subsidies are provided to eligible individuals to help cover housing costs.

Income Support (Revenue de Solidarity Active - RSA): This benefit provides financial assistance to individuals and families with low incomes.

*https://data.worldbank.org/indicator/P-.NUS. PPP?locations=IN*

## तमाम कामगारांसाठी... फ्रान्समधील चौथ्या क्रांतीचं मर्म (क्रांती-वर्षे... १७७९, १८३०, १८४८ आणि २०२४)....

ज्या फ्रेंच-राज्यक्रांतीनंतरच, संसदेत बसण्याच्या व्यवस्थेतून 'डावे' (साम्यवादी-समाजवादी गट) आणि 'उजवे' (भांडवलवादी गट) अशा दोन परस्परविरोधी विचारसरणीच्या लोकांचं विभाजन जगभरात रूढ झालं...त्याच फ्रान्समधे, नुकत्याच पार पडलेल्या 'फ्रेंच नॅशनल सेंब्ली'च्या सार्वत्रिक-निवडणुकीत डाव्यांना मोठा ऐतिहासिक विजय मिळालाय... आणि, तो विजय म्हणजे जणू, युरोप-अमेरिकेसारख्या भांडवलप्रधान राष्ट्रांमधल्या बदलत्या सामाजिक व राजकीय वातावरणाची नांदीच होय!

यंदाच्या फ्रान्समधील निवडणुकीत 'न्यू पॉप्युलर फ्रंट' (NFP) या डाव्या-आघाडीला, ५७७ संसद-सदस्यांच्या सभागृहात सर्वात जास्त; म्हणजे, १८२ जागा मिळाल्या...राष्ट्राध्यक्ष एमॅन्युएल मॅक्रॉन यांच्या 'एन्सेंबल आघाडी'ला १६३ तर, ज्यांच्या संभाव्य विजयाच्या मोठ्या बाता मारल्या जात होत्या, त्या अतिरेकी उजव्या विचारसरणीच्या 'मेरीन ली पेन' यांच्या 'नॅशनल रॅली' (RN) आघाडीला (आपल्याकडच्या 'चार सौ पार'चा पोकळ नारा देणाऱ्या मछऊअ' सारखीच असणारी) फक्त, १४३ जागा मिळाल्या!

सोशालिस्ट पार्टीतून फुटून निघत, स्वतःचा 'पॅलेस्टाईन-समर्थक', कडव्या डाव्या विचारसरणीच्या 'फ्रान्स अन्बाऊड पार्टी'ची (LFI) स्थापना करणाऱ्या 'जीन-लुक मेलॉशाँ' यांनी छत्रछ या डाव्या व निसर्ग-पर्यावरणवादी 'हरित' (Green Party) अशा, चार-पक्षांच्या आघाडीत सर्वात जास्त जागा पटकावल्या असून त्यांच्या धोरणसूचीत अग्रक्रमाने....

१) फ्रेंच किमान-वेतन दरमहा १६०० युरो करण्याचं अभिवचन आहे...म्हणजे, भारतीय चलनात प्रतिमाह रु.१,४५,०००/- इतकं करण्याचं प्रस्तावित आहे, जेव्हा, भारतातलं औद्योगिक-सेवा क्षेत्रातील किमान-वेतन धड 'पाच आकडी' म्हणजे, रु.१०,००० (दहा हजार रु.) देखील नाही! म्हणजेच, यापुढे LFI पक्षाच्या मेलॉशाँ यांच्या विजयामुळे, 'फ्रेंच किमान-वेतन' हे, सर्वसाधारण 'भारतीय किमान-वेतनाच्या जवळपास १५ पटी'ने जास्त असणार आहे!

२) वीज, गॅस व इतर जीवनावश्यक वस्तुंच्या किंमतीना वाजवी अशी 'अधिकतम-मर्यादा' (Ceiling) निश्चित केली जाणार आहे, ज्यामुळे भारतात जशी सामान्य भारतीय-नागरिक महागाईच्या आगीत पोळून निघतायत त्यातला प्रकार होणार नाही (इथले 'अंधभक्त' व त्या अंधभक्तांचे भाजपाई-संघीय नेते मंडळी...महागाई, बेरोजगार-अर्धरोजगारीसारख्या जीवनमरणाच्या मुद्द्यांना 'गौण' ठरवत... जातधर्मविद्वेषी प्रचाराला, भंपक राष्ट्रवादाला व दांभिक 'हिंदुत्वा'ला पुढावा देण्याची बदमाषी करत जनतेला 'मूर्ख' बनवतायत; तसेच, लोकशाहीसंस्था बेकायदेशीररित्या व बळजबरीने ताब्यात घेऊन राज्यकारभार करु पहातायत)

३) मेक्रॉन-सरकारने जबरदस्तीने लागू केलेल्या नव्या 'कामगार-कर्मचारीविरोधी 'निवृत्तीवेतन-योजने'ला (New 'Anti-Labour' Pension-Scheme) ज्यात निवृत्तीचं वय ६२ वरुन ६४ करण्यात आलं होतं, ती रद्द करुन पुर्वीप्रमाणेच जुनी कामगारहितैषी 'निवृत्तीवेतन-योजना' लागू केली जाणार आहे.

४) निसर्ग-पर्यावरण संवर्धन व संरक्षणासाठी 'कार्बन-ऊत्सर्जन' कमीत कमी राखून... 'कल्याणकारी-राज्य' संकल्पनेअंतर्गत सार्वजनिक शिक्षण-आरोग्य, महिला-बालविकासासारख्या योजनांवर सरकारी खर्चाचा भर असणार आहे.

***...राजन राजे***

## Once I'm elected, I will become vegetarian




*शब्दांच्या 'सप्तपदी'त आणि चित्रकाराच्या (हा छायाचित्रकाराचा करिश्मा असू शकत नाही; कारण, निव्वळ फोटोसाठी म्हणूनही, कितीही निर्बुद्ध असल्या तरी, 'मेंढ्या' सिंहाशेजारी उभ्या रहाणार नाहीत...पण, मतदार असलेल्या माणसांचा 'भरवसा' नाही) कुंचल्याचा आधार घेत, रामगोपाल वर्माने आजच्या भाजपाई-संघीय राजकारणाचं प्रत्ययकारी वास्तव मांडलंय!*

# नीट पेपरफुटीमागे गुजराथ कनेक्शन!



## राजन राजे यांचा, मोदी-शहांवर घणाघाती आरोप...

### केंद्र सरकारच्या लोकशाहीविरोधी कृतीबाबत 'धर्मराज्य पक्षा'ची ठाण्यात मूकनिदर्शने

ठाणे (प्रतिनिधी) : संसदेच्या सभागृहात राहुल गांधी, विरोधी पक्षनेत्याच्या अधिकाराने नीट पेपरफुटीप्रकरणी बोलत असताना, त्यांचा माईक बंद केला गेला. त्यावर लोकसभाध्यक्ष म्हणाले की, ''माईक कोणी बंद केला हे मला माहित नाही'' मग, सभागृह कोण चालवतंय? लोकसभाध्यक्ष, पंतप्रधान की, राष्ट्रपती? मुळात मुद्दा असा आहे की, ओमप्रकाश बिर्ला यांना, सगळं माहित आहे, पण ते खोटं बोलत आहेत. बिर्ला हे, राजस्थानच्या कोटा लोकसभा मतदारसंघाचं प्रतिनिधित्व करतात. याच कोटामध्ये नीट आणि इंजिनियरिंगपासून ते आयएएस, आयपीएस तसेच, राष्ट्रीय पातळीवरील ज्या स्पर्धा परीक्षा होतात, त्याचे कोचिंग क्लास चालतात. यात करोडो रुपयांचं उत्पन्न असून, यातील पैसा राजकारणी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांमध्ये वाटला जातो. म्हणूनच आमच्या डोक्यात असा संशय आहे, हा एकप्रकारचा कट तर नाहीये ना? नीटच्या पेपरफुटीची पोलखोल होऊ नये, यासाठीच राहुल गांधींचा माईक बंद केला गेला. कालपरवा गुजराथमध्ये राकेश राठोड आणि दीक्षित पटेल या दोघांना याप्रकरणी अटक करण्यात आलीय.

ठाणे (प्रतिनिधी) : संसदेच्या सभागृहात राहुल गांधी, विरोधी पक्षनेत्याच्या अधिकाराने नीट पेपरफुटीप्रकरणी बोलत असताना, त्यांचा माईक बंद केला गेला. त्यावर लोकसभाध्यक्ष म्हणाले की, ''माईक कोणी बंद केला हे मला माहित नाही'' मग, सभागृह कोण चालवतंय? लोकसभाध्यक्ष, पंतप्रधान की, राष्ट्रपती? मुळात मुद्दा असा आहे की, ओमप्रकाश बिर्ला यांना, सगळं माहित आहे, पण ते खोटं बोलत आहेत. बिर्ला हे, राजस्थानच्या कोटा लोकसभा मतदारसंघाचं प्रतिनिधित्व करतात. याच कोटामध्ये नीट आणि इंजिनियरिंगपासून ते आयएएस, आयपीएस तसेच, राष्ट्रीय पातळीवरील ज्या स्पर्धा परीक्षा होतात, त्याचे कोचिंग क्लास चालतात. यात करोडो रुपयांचं उत्पन्न असून, यातील पैसा राजकारणी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांमध्ये वाटला जातो. म्हणूनच आमच्या डोक्यात असा संशय आहे, हा एकप्रकारचा कट तर नाहीये ना? नीटच्या पेपरफुटीची पोलखोल होऊ नये, यासाठीच राहुल गांधींचा माईक बंद केला गेला. कालपरवा गुजराथमध्ये राकेश राठोड आणि दीक्षित पटेल या दोघांना याप्रकरणी अटक करण्यात आलीय. याधीही सगळेच घोटाळेबाज गुजराथमधूनच पळून गेलेत आणि तेदेखील बहुतांश 'मोदी' आडनाव असलेले, त्यामुळे नीट पेपरफुटीमागे




गुजराथ कनेक्शन असणारच, असा थेट घणाघाती आरोप 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष राजन राजे यांनी, बुधवारी संध्याकाळी ठाण्यात पत्रकारांशी बोलताना केला. नव्याने स्थापन झालेल्या लोकसभेचे पावसाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर शुक्रवार, दि. २८ जून-२०२४ रोजी, संसदेचे कामकाज सुरु असताना, विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे नीट परीक्षेसंदर्भातील पेपरफुटीच्या विषयावर बोलत असताना, अचानक त्यांच्यासमोरील माईक बंद झाला. त्यावेळी विरोधीपक्ष नेते राहुल गांधी यांनी, ''माझा माईक सुरु करा'' अशी विनंती लोकसभाध्यक्ष ओमप्रकाश बिर्ला यांना केली असता, ''मी माईक बंद केलेला नाही, त्याचे बटन माझ्याकडे नाही'' असे सांगत, त्यांची विनंती धुडकावली. मुळात, पेपरफुटीच्या मुद्द्यावर सभागृहात चर्चा झाली तर, सरकार व विरोधकांकडून एकत्रितपणे योग्य तो संदेश पोहोचेल, असा सकारात्मक आशावाद विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी बोलून दाखवलेला असतानाही, त्यांचा माईक बंद केल्याच्या लोकशाहीविरोधी कृत्याच्या निषेधार्थ 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने बुधवार, दि. ३ जुलै-२०२४ रोजी, ठाणे रेल्वे स्टेशनबाहेर मूकनिदर्शने करण्यात आली. यावेळी पक्षाध्यक्ष राजन राजे यांच्यासह, 'धर्मराज्य पक्षा'चे उपाध्यक्ष नितीन देशपांडे, पक्षाचे सहसचिव नरेंद्र पंडित, ठाणे लोकसभा उपाध्यक्ष महेशसिंग ठाकूर, 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे सचिव समीर चव्हाण, पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि कामगार सदस्य मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

दरम्यान, यावेळी प्रसिद्धीमाध्यमांशी बोलताना राजन राजे पुढे म्हणाले की, ''सध्या देशात जे काही सुरु आहे, ते याआधी कधीही घडलेलं नाहीये. ७० वर्षे काँग्रेसचे सरकार होते, त्यांच्याही काळात घोटाळे झाले असतील, पण असा घोटाळा कधीच घडलेला नाही. बिहार, तेलंगणा, आसाम या राज्यांत भाजपची राजवट असताना; असेच, घोटाळे झालेले आहेत. भारतातील लाखो तरुण, अशा स्पर्धा परीक्षांमधून आपलं आयुष्य पणाला लावत असतात. एकवेळ नव्हे; तर, दोन-दोन तीन-तीनवेळादेखील ही परीक्षा द्यावी लागते. नीटचे पेपर लिक करण्यासाठी, प्रत्येक परीक्षार्थीकडून १०/१० लाख घेतले गेलेले आहेत. ओमप्रकाश बिर्ला यांच्या कोटा मतदारसंघात तर, हजारो कोटी रुपयांचा शैक्षणिक घोटाळा झालेला आहे. यावर मोदी-शहा काहीही बोलत नाहीत, त्यांना फक्त राहुल गांधींचा माईक बंद करण्यातच पुरुषार्थ वाटतोय. भारतातील तरुण आज वैफल्यग्रस्त झालाय आणि हेच भारताची लोकशाही धोक्यात असल्याचे द्योतक होय!'' अशा शब्दांत राजन राजे यांनी आपल्या भावना परखडपणे मांडल्या.

याप्रसंगी 'धर्मराज्य पक्षा'चे उपाध्यक्ष नितीन देशपांडे पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, ''प्रत्येक लोकसभा सदस्य हा, गौरवशाली लोकशाहीतील जनसेवक असून, इतर मार्ग अस्तित्वात असताना माईक बंद राहणे किंवा करणे व त्याबाबतीत सभापतींनी विशेष दखल घेऊन, सदर असंसदीय प्रकारास उत्तेजन न देता, ते तात्काळ बंद करणे हे लोकशाहीस अपेक्षित असताना, सभापतिपदाची अवनती केल्याचे, यानिमित्ताने स्पष्ट झाले आहे. या माईक बंद कृतीची चौकशी न करणे म्हणजे, पुढील अगदी कोणतेही सरकार त्याचा गैरफायदा घेईल व खऱ्याखुऱ्या जनतेच्या आवाजावर; म्हणजे, लोकशाहीवर बंधने आणणे हेच होय. संसदेचे अधिवेशन चालू असताना आणि थेट प्रक्षेपणाद्वारे ते, लाखो नागरिक पाहत असताना, माईक बंद करणे व त्यावर सभापतींनी दिलेले उत्तर हे, गौरवशाली भारतीय लोकशाहीची प्रतारणा करणारे आहे. सभापती आपल्या कायदेशीर कर्तव्यात कसूर करीत असून, भविष्यात भारतीय लोकशाही आम्हांस धोकादायक दिसत असल्याचे देशपांडे यावेळी पत्रकारांशी बोलताना म्हणाले. सभापतीपदाचे पावित्र्य राखण्यासाठी, सभापतींना योग्य ती समज देऊन, गौरवशाली असणारी आपली लोकशाही वैभवशाली करावी... आणि म्हणूनच, भारतीय लोकशाही अबाधित राहण्यासाठी, 'धर्मराज्य पक्ष' लोकशाहीमार्गाने आपले कर्तव्य पार पाडत असल्याचे, नितीन देशपांडे यांनी शेवटी पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले.

(सणावारांना विरोध कोण कशाला करेल, तो तसा विरोध असूही शकत नाही, असताच कामा नये...)

# तरीही, कृष्ण तेव्हाच दहीहंडी खेळत होता, जेव्हा मथुरेत दुधा, तुपा, दह्याचा पूर येत होता....

घरच्या भातात कालवायला नाही 'दही' आणि मराठी गोविंदा चालले 'दहीहंडी' खेळायला, अशी दारुण मराठी–अवस्था आहे... **महागाईचा उंदीर, रोज खिसा कातरतोय, तरी उंदरावर ऐटीत बसून अधिकाधिक मराठी घराघरात येतोय 'अधिकच्या खर्चात पाडणारा' गणपतीबाप्पा... 'गरबा' ज्यांचा उसना घेतला, 'दसऱ्या'ला त्यांच्या हाती खरी 'सोन्याची पानं' आणि मराठ्यांच्या हाती 'आपट्याची पानं'(ती ही सुकलेली)... मराठी घरातून बाहेर पडलेली 'लक्ष्मी'ची पावलं 'दिवाळी'त, 'व्यापारी' जमातीच्या घरात शिरताना सर्रास दिसतात... मराठी घराघरात कुठल्या न् कुठल्या निमित्ताने खर्चिक 'सत्यनारायण–पुजां'ची रेलचेल, ही ठरलेलीच. धार्मिक जरुर असावं; पण, ती सक्रिय धार्मिकता हवी, ''असेल माझा हरी, तर देईल खाटल्यावरी'' अशी, 'निष्क्रिय' नको (काही बेजबाबदार मराठी तरुणांची, हे म्हणण्यापर्यंत मजल जाताना पहातो आम्ही की, ''मेहनत करुन कोणीही श्रीमंत होईल हो, त्यात विशेष काय''?...** याचा दुसरा अर्थ, त्याना बिनमेहनतीने झटपट मोठं आणि श्रीमंत व्हायचं असतं)... अशी 'चमको' तरुणमंडळी एकतर 'जेवढे खोके, तेवढे ओक्के'वाली फुटीर–विश्वासघातकी बनून 'व्यवस्थे'चा हात धरत, सामान्य मराठी माणसांचा घात तरी करतात (आठवा, नुकताच महाराष्ट्र घडलेला ''सूरत ते गोवा व्हाया गुवहाटी'' हा पंचतारांकित निवास–प्रवास) किंवा गुन्हेगारी विश्वाकडे वाटचाल करतात.

...केवळ, पूजाअर्चा करुन, गणपतीबाप्पाला आणून जर, आपल्या मराठी घरातल्या समस्या नक्की संपणार; असं, कुठेतरी आपण मनोमन गृहीत धरुन चाललो असू तर, लक्षात असू द्या की, ''तसं असतं, तर आपल्या महाराष्ट्रात एवढ्या मोठ्यासंख्येनं गणेशोत्सव व सत्यनारायण पूजा होत असतात की, आपल्या समस्या केव्हाच सुटायला हव्या होत्या, नाही का?''

तसं पाहीलं गेलं तर, सणावारांना विरोध करणारा मी कोण मोठा लागून गेलोय? माझा मुळी सणावारांना विरोध नाहीच, कधि नव्हताच आणि तो तसा विरोध असूही शकत नाही... ज्याच्या जशा धार्मिक भावना, त्या तशा पाळायला प्रत्येक व्यक्ति स्वतंत्र आहेच, असलीच पाहीजे. फक्त,'ऋण' काढून सण साजरे करण्याच्या बेजबाबदार प्रवृत्तीविरोधात आमची जनजागरण मोहीम असू शकते; कारण, **''कर्जाचा सापळा आणि तुटपुंजे वेतनमान'' या कात्रीत अडकलेला सामान्य मराठी माणूस, आपल्या न्याय्यहक्कासाठी, आत्मसन्मानासाठी कधिही धड लढू शकत नाही... हे दुर्दैवी वास्तव (जे, या 'रक्तपिपासू–शोषक व्यवस्थे'नं अचूक ओळखलंय) 'कामगार–क्षेत्रा'त चार दशके आम्ही फार जवळून पहात आलोय. त्यातूनच, कामगार–चळवळीची अतोनात हानी होऊन, महाराष्ट्रात व देशात 'कंत्राटी–कामगार पद्धत' नावाची अवदसा फोफावलीय. त्या दुर्दैवाला केवळ, सर्वपक्षीय राजकारणीच जबाबदार नाहीत; तर, कुठेतरी आपणही सगळे जबाबदार आहोतच!**

**''मराठीचिये केला हिन किती मराठी?''... 'ऋण' काढून सण साजरे करणारे... 'ऋणको' बनून मोठे फ्लॅट/कार/मोटरसायकल/महागडे मोबाईल खरेदी करणारे, ते आम्ही मायमराठीच... ना आम्हाला पैसा सांभाळता येत, ना माणसं... ''माणसाला माणूस आणि पैशाला पैसा जोडायला आम्ही कधि शिकणार?''**

कर्ज मिळणं नुसतं सुलभ करणंच नव्हे; तर, 'व्यक्तिगत कर्ज' मिळण्याचा सुळसुळाट आणि विविध अनावश्यक वस्तूंची, उत्तान पोषाखातल्या सुंदर मॉडेल्स दाखवून आकर्षक जाहिरातबाजी एवढ्याचसाठी केली जाते की, तुमचे पाय कर्ज घेण्याकडे आपसूक वळावेत. तुमची म्हातारपणची आधाराची आर्थिक काठी, तरुणपणीच मोडून पडावी (अनेक कामगार, भविष्यनिर्वाह निधी म्हणजे प्रॉव्हिडंट फंडातून मोठं कर्ज उचलून मोकळे होतात) आणि पुढच्या नोकरीच्या काळाची भरबाजारी आजच 'बोली' लावली जावी!

सोबतच, आपली आर्थिक ऐपत नसेल; तर, घरातील मोठी आजारपणं/अपघात वगैरेंसाठी (विशेषतः, घरातल्या म्हाताऱ्या व्यक्तिंसाठी) शक्यतोवर, अत्यंत महागडी खाजगी इस्पितळे टाळून सार्वजनिक इस्पितळांतून उपचार घेतले जावेत आणि आपल्या पाल्यांनाही शिक्षण देताना (खाजगी क्लासेस टाळून) चांगल्या सार्वजनिक शिक्षण संस्थांचा जरुर शोध घ्या... शिवाय, शिक्षण–आरोग्य, या दोन्ही जीवनावश्यक सेवा, दर्जेदार तसेच, मोफत किंवा सर्वसामान्यांना परवडेल अशा किफायतशीर दराने 'सार्वजनिक क्षेत्रा'कडून दिल्या जाण्यासाठी व सध्या असलेल्या सार्वजनिक सुविधा वाढवण्यासाठी, दर्जेदार ठेवण्यासाठी सर्वपक्षीय राजकारण्यांवरचा आणि प्रशासनावरचा दबाव आपण वाढवत नेलाच पाहीजे

शेठजींची 'उद्योगपती/व्यापारी जमात', जमात म्हणून सुसंघटितपणे जाहिरातबाजीतून तुमच्या अनावश्यक गरजा वाढवत नेऊन, तुम्हाला श्रमाचा अत्यल्प मोबदला देऊन, तुमच्यात फुटीची बीजं पेरत दुही माजवून, तुमची 'संघटना–ताकद' संपवूनच तुम्हाला दिवसाढवळ्या सर्रास लुटत असते.... लक्षात ठेवा, ''जमातीचा मुकाबला 'जमात'च करु शकते, एकटीदुकटी व्यक्ति नव्हे... 'व्यवस्थेविरुद्ध व्यवस्था'च उभी करावी लागते!''

''तुम्ही मराठी माणसं आहात, पण फक्त नावालाच''... आजच्या भांडवली–बाजारात आहात तुम्ही फक्त, 'कंपनी–दहशतवादा'ला रोज गपगुमान सामोरे जाणारे हीनदीन असे 'कंत्राटी–गुलाम' (कामगार–कर्मचारी नव्हे हं)! आपल्या 'मराठीत्वा'ला, 'महाराष्ट्रधर्मा'ला जागवा आणि त्यासोबतच, आपसूक येणाऱ्या 'शिवबा–संतां'च्या महन्मंगल 'हिंदुत्वा'लाही जपा, ते नीट अंगी खोलवर बाणवा!

जातिवंत हिंदू, कुठल्याही इतरे धर्मीयांचा मुळीच द्वेष करत नाही... 'हिंसया दूयते चित्तम्' म्हणजे, ''हिंसेने ज्याच्या हृदयाला, चित्ताला दुःख होते आणि जो दुसऱ्याची पीडा जाणतो, सर्व धर्मीयांना समान न्यायाने वागवतो... तो खरा हिंदू... सर्व प्राणीमात्रांमध्ये, चराचरामध्ये जो ईश्वराचा अंश पाहू शकतो आणि म्हणूनच निसर्ग–पर्यावरणाची डोळ्यात तेल घालून काळजी वहातो... तो जाज्वल्य हिंदू!

मात्र, परिस्थितीवशात अन्याय–अत्याचाराचा किंवा अनन्वित शोषणाचा श्रीकृष्णाच्या किंवा शिवछत्रपतींच्या नीतिने कठोरपणे मुकाबला करताना... सगळे उपलब्ध सनदशीर मार्ग खुंटले की, 'आखरी रास्ता' या उक्तीनुसार अगदी नाईलाजास्तव जो, 'परित्राणाय साधुनाम्, विनाशायच् दुष्कृताम्' या परमपवित्र भावनेनं, 'न्याय–प्रस्थापने'साठीच केवळ, हाती शस्त्र धरतो... तो खरा 'हिंदू'!''

...असं शिवछत्रपतींचं 'मराठीत्व' खरोखरीच स्मरलंत, जपलंत आणि ''मराठा तितुका मेळवावा, महाराष्ट्रधर्म वाढवावा... आहे तितुके जतन करावे, आणिक पुढे मेळवावे'', या समर्थ रामदासांच्या संदेशानुसार, 'मराठी' म्हणून असाल तिथे संघटित होऊन मराठी हितासाठी संघर्ष केलात, मराठी–मतदार म्हणून मतदान करते झालात; तरच, ''धर्मो रक्षति रक्षितः'' या न्यायाने 'मराठीत्व'च तुमचं रक्षण करेल, 'मराठीत्व'च तुम्हाला वाचवू शकेल.

**मी सांगतो, ते हृदयावर कोरुन ठेवा, ''मराठीत्व आणि 'भाजपाई हिंदुत्व' या परस्परविरोधी, एकमेकाला छेद देणाऱ्या बाबी आहेत''... त्यामुळेच, हे जाणून घेणं खूप खूप महत्त्वाचं आहे की, 'भाजपाई' बेगडी, ढोंगी, फसवं हिंदुत्व'', तुम्हाला आजही आणि उद्याही, कायम 'शेठजीं'च्या तालावर 'गुलामा'सारखं नाचवत राहील; तेव्हा, कदाचित आमच्यासारखी 'मराठीचा वसा' घेतलेली चुकार माणसं, तुमच्याच कर्माने शिल्लक देखील राहीलेली नसतील!**

**...सध्या, महाराष्ट्राच्या राजकारणात वेगळं काय चाललंय. 'ईडी/आयटी/सीबीआय'चे डोळे वटारुन गुरगुरणारे 'बोके' आणि भांडवलदार शेठजींचे 'खोके'... यांच्या अमंगळ, अभद्र प्रभावाखाली 'भाजपा'च्या कुटील, शकुनीनीतिला सहजी बळी पडलेले महाराष्ट्रातील राजकीय 'कचकड्याचे बाहुले', ''काल गुवाहटीला 'ओक्के ओक्के' म्हणत पंचतारांकित हॉटेलमध्ये आणि आज 'पन्नास थरा'च्या दहीहंडीला ठाण्या–मुंबईत, दुसरं वेगळं काय करुन दाखवतायत... आणि, भविष्यात अजून वेगळं काय करणार आहेत''???**

महाराष्ट्राची ६०%हून अधिक (एका अंदाजानुसार जवळपास ७५%) धनसंपदा, साधनसंपत्ती गुजराथी–भाषिकांच्या हातात केव्हाचीच गेलीय; तेव्हा, या 'राजकीय कळसूत्री बाहुल्यां'चं अशातऱ्हेनं स्वतःला विकून तर झालेलंच आहे, फक्त आता, उरलीसुरली महाराष्ट्राची सगळी संपदा 'बुलेट ट्रेनच्या वेगा'ने शेठजींच्या स्वाधीन करा आणि शिवछत्रपतींच्या स्मारकासोबतच अरबी समुद्रात बुडी घ्यायला, एकदाचे सर्वांनाच मोकळे करा... धन्य आहे, त्या तथाकथित 'हिंदुत्ववादी' फुटीरांची, जे एरव्ही सर्वसामान्य मराठी माणसांवर, विशेषतः आंदोलक मराठी कामगारवर्गावर, छान गुरगुरतात; पण, शेठजींसमोर मात्र, 'पालीसमोर विंचवानं टाकावी' तशी, पटकन नांगी टाकतात!

।। जय महाराष्ट्र, जय हिंद ।।

***... राजन राजे*** (अध्यक्षः धर्मराज्य पक्ष)

# “जशी वाघाला नखं अन् गरुडाला पंखं तशी, मुंबई मराठी माणसाला...”

या दहा शब्दांत, अण्णाभाऊंनी मुंबईचं आणि महाराष्ट्राचं अतूट नातं सांगितलेलं आहे. शेटजी, भटजी आणि लाटजींनी अण्णाभाऊंच्या याच महान प्रतिभेचा धसका घेतलेला होता...

मोरारजी देसाई आणि स. का. पाटलांना गुडघे टेकायला लावणारा, हा फाकड्या हातात हलगी घेऊन,

“माझी मैना गावावर राहिली,
माझ्या जीवाची व्हतीया काहिली...”

ही छक्कड गात, हा मराठी अस्मितेचा हुंकार देऊन, कामगारांच्या हृदयावर राज्य करीत, मुंबई वाचवायला सर्वात पुढे होता. आज मुंबईत मराठी माणसाची हेटाळणी होणार असेल; तर, मराठी माणसाच्या दिमतीला निर्विवादपणे उभा राहणारा शाहीर कुणी असेल, तर तो शाहिरांचा शाहीर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, हाच असेल!

अण्णाभाऊंनी केवळ मुंबई महाराष्ट्रात राहावी, म्हणूनच लढा दिलेला नाही; तर, ब्रिटिश साम्राज्यशाहीविरुध्द झालेल्या अत्यंत निर्णायक लढ्यापैकी एक ठरलेल्या नौसेनेच्या बंडात रणमैदानात उतरुन अण्णाभाऊंनी प्रत्यक्ष ‘जीवन आणि मृत्यू’च्या संघर्षात निर्भयपणे योगदान दिलेले आहे.

१९४६ साली जेव्हा नौसैनिकांनी ब्रिटिशांच्या विरुद्ध बंड पुकारले; त्यावेळी, मुंबईतील कामगार, नौसैनिकांच्या बाजूने रणांगणात उतरला होता. कामगारांचे जथ्थेच्या जथ्थे नौसैनिकांना मदत करण्यासाठी अरबी समुद्राच्या दिशेने चाल करु लागले होते. त्यावेळी, हा लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, अमर शेख पोवाडे गात त्या ‘कामगारांच्या मोर्चा’मध्ये शब्दशः रोमांच निर्माण करत होते. कामगारांच्या लाल रक्तात क्रांतीच्या ठिणग्या पेरत होते... ब्रिटीशांच्या फौजा जेव्हा बंदुकीचा भडिमार करत असताना, शाहिरांची कवनं, इंग्रजांशी लढण्याची प्रेरणा देत होती.

म्हणून, अण्णाभाऊ साठे लिहीतात...

“झालं फाऊंटनला जंग,
आला मैदानी रंग,
मनी बांधुनी चंग
गोळी डमडमची छातीवर साहिली
माझ्या जीवाची होतीया काहिली...”

या मुंबईसाठी आणि स्वातंत्र्यासाठी छातीवर गोळ्या झेलायला तयार असलेला मराठी मुलखाचा महान भूमिपूत्र म्हणजे, अण्णाभाऊ साठे... हे आजच्या आणि येणाऱ्या पिढ्यांनी कधिही विसरता कामा नये.

अण्णाभाऊंचं मुंबईशी असणारं नातं स्वातंत्र्य-आंदोलन, संयुक्त-महाराष्ट्र आंदोलन, कामगार चळवळ, कलासाहित्य चळवळ... अशा अनेक पातळीवर आहे. अशा साहित्यरत्न लोकशाहीर कॉम्रेड अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त नुसतंच विनम्र अभिवादन नव्हे;

तर, इथून पुढे, येणाऱ्या प्रत्येक निवडणुकीत....

लेवूनिया “वाघनखं अन् गरुडाचे पंख, मराठी माणूस जरी रंक... तरी, भाजपाई शेटजी-भेटजींना अखेरचा मारेलच कडकडून डंख” ...!!!

“संयुक्त महाराष्ट्रानंतर...आता, ‘स्वायत्त-महाराष्ट्र’.... राष्ट्रांतर्गत राष्ट्र ‘स्वायत्त-महाराष्ट्र’... ‘शिवछत्रपती राष्ट्र’ !!!”

।। जय महाराष्ट्र, जय हिंद ।।


*(समाजमाध्यमाच्या सौजन्याने, ‘धर्मराज्य पक्षा’तर्फे ‘महाराष्ट्र’हितार्थ प्रसारित....)*



सेफ्टी व्हॉल्व आणि आग प्रतिबंधक उपकरणांची दर्जेदार निर्मिती करणाऱ्या, नवी मुंबईस्थित रबाळे एमआयडीसी येथे कार्यरत असलेल्या प्रोटेगो इंडिया प्रा. लि. या कंपनीच्या व्यवस्थापनातील उच्चाधिकाऱ्यांनी शुक्रवार, दि. १९ जुलै-२०२४ रोजी, ‘धर्मराज्य पक्ष’प्रणित ‘धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा’च्या ठाणे कार्यालयात उपस्थित राहून, अध्यक्ष मा. राजन राजे यांची भेट घेऊन, कंपनीतील कामगार सदस्यांच्या नवीन सेवाशर्तींच्या, त्रैवार्षिक पगारवाढीसंदर्भात चर्चा केली. यावेळी कंपनी व्यवस्थापनाच्या वतीने, एच.आर. प्रमुख श्रीमती पूजा विजन, जनरल मॅनेजर श्री. उमेश पवार; तर, युनियनचे कंपनीतील युनिट अध्यक्ष श्री. ज्योतिर्लिंग घोडके, युनिट सदस्य श्री. दिलीप सावर्डेकर यांच्यासह, ‘धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा’चे उपाध्यक्ष श्री. रमाकांत नेवरेकर, महासचिव श्री. महेशसिंग ठाकूर, सचिव श्री. समीर चव्हाण आदी मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

दरम्यान, नूतन त्रैवार्षिक करारासंदर्भात दि. ११ जुलै-२०२४ रोजी कंपनी-कार्यालयात कंपनीच्या डॉ. लँडीस या जर्मन एम.डी. साहेबांशीही यापूर्वी वादळी बैठक पार पडली होती. त्यात एमडीसाहेबांनी कंपनीच्या प्रगतीचा आलेख गेली काही वर्षे दुर्दैवाने बिलकूल उंचावत नसल्याबद्दल खंत व्यक्त करुन, DKKM युनियनच्या व प्रोटेगो-कामगारांच्या अपेक्षा अंशतः पूर्ण करण्यासही समर्थ नसल्याचा ठाम पवित्रा घेतला होता. त्यानंतर, उपरोल्लेखित बैठक तणावपूर्ण व काहीशा निराशेच्या वातावरणात पार पडली...मात्र, दोन्ही बाजुंकडून सामंजस्याने तोडगा काढण्याचा निर्धारही याच बैठकीत व्यक्त करण्यात आला व त्यादिशेने, लवकरच हालचाली होण्याच्या वार्तेने कंपनीत सर्वत्र आशादायक व उत्सुकतेचं वातावरण निर्माण झालंय.

# अंबानी कुटुंबातील लग्नाच्या निमित्ताने....



ही तिच लोकं आहेत, अंबानी किंवा तत्सम अतिश्रीमंत लोकांच्या चंगळवादामुळे, भरपूर पैसे खर्च करतात... पण, त्यामुळे चार लोकांना रोजगार तरी मिळतात म्हणणारी!

ही तिच लोकं आहेत, श्रीमंतांच्या घरातील समारंभात, मांडवाबाहेर अन्नाची लाजिरवाणी, ओंगळवाणे प्रतिक्षा करावी लागते... पण, गरिबांच्या तोंडात आयुष्यात एकदा तरी गोडधोड पडते असे म्हणणारी!

ही तिच लोकं आहेत, रियल इस्टेट, बिल्डर, लँड शार्क यांच्या गैरकृत्यांकडे, नफेखोरीकडे दुर्लक्ष करुन... पण, ते घरे बांधतात म्हणून कसेही बांधलेले का होईना, कितीही कर्जे काढावी का लागेनात; मात्र, लोकांना घर मिळते म्हणणारी!

ही तिच लोकं आहेत, जमीन विकून, कर्ज काढून, पोटाला चिमटा घेत, लाखो रुपयांच्या फिया भरुन, शिक्षण-सम्राटांच्या शाळा कॉलेजांची साम्राज्ये उभे रहात असतात... पण, त्यामुळे मुला-मुलींना शिक्षणाचे पाणी तरी लागते म्हणणारी!

ही तिच लोकं आहेत, जल, जंगल, जमीन, डोंगर, समुद्र, नद्या आणि एकूणच पर्यावरण यांचा नाश होतो आहे, हे खरे... पण, त्यामुळे आर्थिक विकासदेखील होत आहे असे म्हणणारी! ही तिच लोकं आहेत, ज्यांच्या कवटीतील स्वतंत्र विचार करण्याची क्षमता असणाऱ्या, मेंदूच्या वापर न करणारी...

राजकीय अर्थव्यवस्था म्हणून काहीतरी असते, त्याचा अभ्यास करायचा असतो, हे माहित करुन न घेणारी...

आत्मसन्मान देणारा रोजगार, घर खरेदी आणि मुलांच्या शिक्षणामुळे कायमचे कर्जबाजारी... पण, न जन्मलेल्या येणाऱ्या पिढ्यांसाठी, पृथ्वी आणि पर्यावरण किमान जिवंत तरी ठेवले पाहिजे, माणसाचा आत्मसमान, हे कोणतेही शब्द कानावर न पडलेली!

ही तिच लोकं आहेत, त्यांच्या तोंडी कधिही लागू नये...!!!

*....संजीव चांदोरकर*

**आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्रीय मतदारांच्या हितासाठी ''जनतेचा जाहीरनामा'' सादर करण्याच्या उद्देशाने, 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष मा. राजन राजे यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार, दि. २६ जुलै–२०२४ रोजी, पक्षाच्या ठाणे कार्यालयात समविचारी विचारवंतांची एक महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. या बैठकीत ज्येष्ठ बँकिंग तज्ञ मा. विश्वास उटगी, आंबेडकरवादी नेते मा. आनंदा होवाळ, संविधान लोकजागर परिषदेचे अध्यक्ष तसेच, राष्ट्रीय धर्मनिरपेक्षता आंदोलनाचे सदस्य मा. भगवान अवघडे, आंबेडकरवादी कार्यकर्ते मा. संजय गुरव, मा. वृषाली माने, 'धर्मराज्य पक्षा'चे ठाणे लोकसभा अध्यक्ष मा. राजेश गडकर, ठाणे लोकसभा उपाध्यक्ष मा. महेशसिंग ठाकूर आणि 'धर्मराज्य कामगार–कर्मचारी महासंघा'चे उपाध्यक्ष मा. रमाकांत नेवतेकर आणि सचिव मा. समीर चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते. दरम्यान, ''जनतेचा जाहीरनामा'' घेऊन, मागील लोकसभा निवडणुकीत, समविचारी पुरोगामी संघटनांनी एकत्र येत 'इंडिया आघाडी'ला बिनशर्त पाठिंबा दिला होता. याच अनुषंगाने, आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर, राजकीयदृष्ट्या या जाहीरनाम्यात योग्य ते बदल करावेत, विधानसभा निवडणुकीसाठी जनतेची राजकीय–रणनीती ठरविणे, यासंदर्भात या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.**

दरम्यान, या बैठकीचे अध्यक्ष असलेले मा. राजन राजे यांनी, राजकीय प्रस्थापित व्यवस्था, भांडवलशाही आणि कंत्राटीकरण नावाची गुलामगिरी, यावर आपले परखड मत मांडले. कंत्राटीकरणाकडे, आंबेडकरी चळवळीने, कम्युनिस्टांनी आणि समाजवादी चळवळीने गांभीर्याने न बघितल्याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली. कंत्राटी–कामगारपद्धत नावाची गुलामगिरी व नव–अस्पृश्यता, हाच खरा राष्ट्रीय मुद्दा असून, अर्धरोजगारीतही लोकं आनंदात राहायला लागलेत, हाच खरा सर्वात मोठा धोका असल्याचे, स्पष्ट प्रतिपादन करीत, मा. राजन राजे यांनी धनदांडग्या भांडवलदारी व्यवस्थेवर एकच ताशेरे ओढले. भांडवलशाही हे एक व्यसन आहे आणि म्हणूनच, धनदांडग्यांच्या हातात सत्ता व संपत्ती देणारी भारतीय अर्थव्यवस्था असावी, हे आपलं दुर्दैव होय. यासाठी उच्चशिक्षित तरुणांचा उडालेला मानसिक–वैचारिक गोंधळ संपविणे महत्त्वाचे आहे. आमच्याकडे गरिबीच्या रेषेविषयी बोलतात; पण, श्रीमंतीच्या रेषेविषयी कोणीही बोलत नाही, अशा शब्दांत 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष मा. राजन राजे यांनी, आपल्या संतप्त भावना यावेळी बोलून दाखविल्या.





**याप्रसंगी, ज्येष्ठ बँकिंग तज्ञ आणि धारावी पुनर्विकास योजनेतील पीडित झोपडपट्टीधारकांच्या बाजूने, सरकार–दरबारी संघर्ष करणारे मा. विश्वास उटगी यांनीदेखील आपली परखड मते यावेळी मांडली. सर्व शासकीय उपक्रमातील क्षेत्रे अदानीच्या ताब्यात दिली जात आहेत. ज्याप्रमाणे जमीन हस्तांतरीत केली जाते; अगदी तशीच, अदानीला मुंबई हस्तांतरीत करण्याचा डाव शासनाने आखलेला असून, मुंबई वाचविण्याबरोबरच आता, महाराष्ट्र वाचविण्याची खरी गरज असल्याचे विधान मा. विश्वास उटगी यांनी यावेळी केले.** सरकारला सर्व सार्वजनिक व्यवस्थेचे खासगीकरण करायचे आहे. शिक्षण आणि आरोग्य व्यवस्थेबरोबरच, त्यांना मुंबईची बेस्ट, महाराष्ट्राची एसटी आणि देशाची रेल्वे, अशी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था संपवायची असून, यातून देशाचं संविधान धोक्यात आलेलं आहे. येत्या १५ ऑगस्टपूर्वी, आपण आपला सुधारित असा पूर्ण जाहीरनामा घेऊन लोकांमध्ये जाऊन, जनजागृती करणे अत्यंत आवश्यक असल्याचे ठाम मत मा. विश्वास उटगी यांनी यावेळी मांडले. यादरम्यान, ज्येष्ठ आंबेडकरवादी नेते मा. आनंदा होवाळ यांनी, आरक्षणाच्या मुद्द्यावर आपली मते मांडून, देशातील धार्मिक आणि जातीय विषमतेवर टीका केली. भारताच्या सामाजिक व्यवस्थेला व राष्ट्रीय एकात्मतेला 'आरएसएस'पासूनच खरा धोका आहे आणि म्हणूनच, आगामी विधानसभा निवडणुकीत आपण आपला ''जनतेचा जाहीरनामा'' प्रखरपणे मांडला पाहिजे, असे मा. आनंदा होवाळ यांनी स्पष्टपणे नमूद केले. एकंदरीतच ही बैठक सकारात्मक आणि परिणामकारक ठरल्याने, सर्वच उपस्थित मान्यवरांनी समाधान व्यक्त केले.

मोदी–शाहांच्या भाजपाई केंद्र सरकारपुरस्कृत, येऊ घातलेल्या कामगारविरोधी काळ्या कायद्यांपासून आणि नव–अस्पृश्यता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कंत्राटी–कामगारपद्धतीच्या गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी, मुजोर कंपनी व्यवस्थापन व प्रस्थापित राजकीय व्यवस्थेशी सनदशीरमार्गाने संघर्ष करुया...

'धर्मराज्य पक्ष'प्रणित
'धर्मराज्य कामगार–कर्मचारी महासंघ'
या कामगार संघटनेत सामील व्हा !!!



राजन राजे
(अध्यक्ष)



महेशसिंग ठाकूर
(महासचिव)
९७६९५ २५००६



रमाकांत नेवरेकर
(उपाध्यक्ष)
७२०८८ ७९१९७



कार्यालयीन पत्ता : तळमजला, रविदर्शन बिल्डिंग, डॉ. बेडेकर हॉस्पिटलजवळ, राममारुती क्रॉस रोड, डीएनएस बँकेच्या मागे, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२. संपर्क क्र. ७७७७०६९५३०

Printed, Published and Owned by **Rajan Raghunath Raje Printed** at, **Siddhakala Print Media and Publications Pvt. Ltd.**, Plot No. W 230, T.T.C. Industrial Area, Khairne, Navi Mumbai, Dist -Thane, Pin Code -400710 and Published from Shubharambha, Phase - 1 Building No. 7, Room No. 601 - 602, Kokani Pada Marg, Off. Ghodbunder Road, Manpada, Thane [West], Apna Bazar S.O, Dist - Thane, Pin Code - 400610, Maharashtra. Editor : **Maheshsingh Narayansingh Thakur (97695 25006)** (TITLE CODE : MAHMAR52590)